मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

# वृत्तमानस

https://epapervrittamanas. in/

मुंबई/ पालघर | शनिवार, २ ऑगस्ट २०२५ | वर्ष- ३० | अंक-४२ | पाने - ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

Email : vrittamanas1@gmail. com

## 2 बोगी रुळावरून घसरल्या, चालत्या ट्रेनमधून प्रवाशांनी उड्या मारल्या

**कानपूर :** कानपूरमध्ये रेल्वे अपघात झाला आहे. भाऊपूर (पनकी) येथे जनसाधारण एक्सप्रेसचे दोन डबे रुळावरून घसरले. ही ट्रेन मुझफ्फरपूरहून अहमदाबादला जात होती.रुळावरून घसरलेले डबे सामान्य होते. ट्रेनला अचानक झटका बसल्यानंतर, मागच्या बाजूचे डबे एका बाजूला झुकू लागले, त्यानंतर प्रवासी ट्रेनमधून उड्या मारू लागले. खूप आरडाओरडा झाला. लोक एकमेकांना मदत करण्यासाठी धावताना दिसले. महिला आणि मुलांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले.



खासदारांना रोखण्यासाठी संसदेत कमांडो

पान ४

# निवृत्त व्हा, कुठेही जा... तुम्हाला सोडणार नाही !

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

मागील काही काळापासून विरोधक सातत्याने निवडणूक आयोगावर भाजपसाठी काम केल्याचा आरोप करत आहेत. बिहारमधील मतदार यादीवरुन तर बराच गदारोळ सुरू आहे. अशातच, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी निवडणूक आयोगावर मोठा आरोप केला. 'मतं चोरीला जात आहेत. आमच्याकडे याचे ठोस पुरावे आहेत. मी गांभीर्याने बोलतोय, निवडणूक आयोगच या मतचोरीत सहभागी आहे. आयोग हे भाजपसाठी करत आहे,' असा आरोप राहुल गांधी यांनी केला.

'मते चोरीला जात आहेत. आमच्याकडे आता याचे ठोस पुरावे आहेत. निवडणूक आयोगही यात सहभागी आहे. मी हे अगदी गंभीरपणे सांगतोय, निवडणूक आयोगातील जो कोणी हे काम करत आहे. वरपासून खालपर्यंत...आम्ही तुम्हाला सोडणार नाही. तुम्ही भारताविरुद्ध काम करत आहात, हा देशद्रोह आहे. तुम्ही कुठेही असाल, निवृत्त व्हा, कुठेही जा...आम्ही तुम्हाला शोधून काढू,' असा संतप्त इशाराही राहुल गांधी यांनी राष्ट्रीय निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांना दिला.

राहुल गांधी यांनी यापूर्वी म्हटले होते की, महाराष्ट्र निवडणुकीत आमची फसवणूक झाली. आम्ही निवडणूक आयोगाला मतदार यादी दाखवण्यास सांगितले, पण आम्हाला मतदार यादी दाखवण्यात आली नाही. आम्ही म्हटले होते की व्हिडिओग्राफी दाखवावी, नंतर व्हिडिओग्राफीचा कायदाच बदलण्यात आला. महाराष्ट्रात एक कोटी नवीन मतदार जोडले गेले. आम्ही कर्नाटकात नुकतेच संशोधन केले, तिथे एक मोठी चोरी पकडली आहे.

### राहुल गांधींचा निवडणूक आयोग अधिकाऱ्यांना इशारा



### आम्हाला जे सापडले ते अणुबॉम्बसारखे ...

संसद भवन परिसरात मीडियाशी बोलताना राहुल गांधी म्हणाले, 'आम्हाला मध्य प्रदेशात शंका होती. लोकसभा निवडणुकीतही शंका होती. महाराष्ट्रातील निवडणुकीदरम्यान आमची शंका आणखी वाढली. आम्हाला संशय होता की, राज्य पातळीवर एक कोटी मतदार जोडले गेले आहेत. आम्ही तपशीलात गेलो, मात्र निवडणूक आयोगाने मदत केली नाही. आम्ही स्वतःहून चौकशी केली. त्याला सहा महिने लागले. पण आम्हाला जे सापडले आहे, ते अणुबॉम्बसारखे आहे. हे जर फुटले, तर तुम्हाला भारतात कुठेही निवडणूक आयोग दिसणार नाही.'चोरी कशी आणि कुठे केली जाते, हे आम्ही लवकरच सर्वांसमोर घेऊन येऊ. आता त्यांना कळले आहे की, आम्हाला त्यांचा खेळ समजला आहे. आम्ही एक मतदारसंघ निवडला आणि तिथे सखोल संशोधन केले. आम्ही त्यांची संपूर्ण व्यवस्था शोधून काढली, ते चोरी कशी करतात, कोण मतदान करते, ते कसे मतदान करतात, नवीन मतदार कसे तयार होतात. आता त्यांना समजले आहे, त्यामुळेच त्यांनी बिहारची संपूर्ण व्यवस्था नवीन पद्धतीने करण्याचा निर्णय घेतला आहे. ते मतदार हटवतील आणि मतदार याद्या नवीन पद्धतीने बनवतील. भारतात निवडणुका चोरीला जात आहेत, हे वास्तव आहे, अशी टीका राहुल गांधी यांनी केली.

## म ह त्वा चे

### दौंडच्या यवतमध्ये 2 समाजांमध्ये वाद अन् तणाव

**पुणे :** पुण्याच्या दौंड तालुक्यातील यवत येथे दोन गटांत जातीय तणाव निर्माण झाला आहे. व्हॉट्सॲपवरील एका आक्षेपार्ह पोस्टमुळे हा वाद भडकला. त्यात दोन्ही गटांनी एकमेकांवर दगडफेक केली. त्यानंतर पोलिसांनी वेळीच घटनास्थळी धाव घेऊन स्थितीवर नियंत्रण मिळवले. सध्या या ठिकाणी तणावपूर्ण शांतता आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडून या घटनेची माहिती घेतली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही थेट घटनास्थळी स्थितीचा आढावा घेतला.

सविस्तर वृत्त पान ६ वर

### शिंदे सेनेच्या माजी नगरसेवक कमलेश राय यांना अटक

**मुंबई :** मुंबई एमआयडीसी पोलिसांनी शिंदे गटाच्या नेत्यावर मोठी कारवाई केली आहे. खंडणी प्रकरणात शिंदे गटाच्या माजी नगरसेवकावर ५० लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा आरोप आहे. याप्रकरणी पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या आहेत. गेल्या काही काळापासून सतत वादग्रस्त ठरत असलेल्या शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक कमलेश राय यांना अखेर एमआयडीसी पोलिसांनी खंडणी प्रकरणात अटक केली आहे. एका बांधकाम प्रकल्पाच्या ठेकेदाराकडून तब्बल पन्नास लाखांची खंडणी मागितल्याचा गंभीर आरोप त्यांच्यावर आहे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या एका बांधकाम साइटवरून माजी नगरसेवक कमलेश राय यांनी ५० लाख रुपयांची खंडणी मागितल्याची माहिती समोर आली आहे.

## महायुतीतील मंत्र्यांचं फडणवीसांना ओझं
# वेट अँड वॉच... सबका नंबर आएगा !

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली होती, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील काही दिवस दिल्लीमध्ये मुक्कामी होते. त्यातच राज्यात माणिकराव कोकाटे यांच्याकडील कृषीखाते काढून घेण्यात आले आहे.तर आता अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीवरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मोठा दावा केलाय

संजय राऊत म्हणाले की, हे सरकार कलंकित झाले आहे. मी खात्रीने सांगतो की, मंत्र्यांना जावे लागेल. वसईच्या आयुक्तांवर



धाड पडलेली आहे. हे 1000 कोटींचे प्रकरण आहे. या प्रकरणात एका मंत्र्यांना जावे लागेल. नव्या क्रीडामंत्रींना योग्य खाते मिळाले आहे. त्यांनाही जावे लागेल. ही व्यवस्था तात्पुरती सुरू आहे. प्रत्येक आरोपी शेवटपर्यंत बचावाचा प्रयत्न करतो. देवेंद्र फडणवीस आणि अमित शहा यांच्या भेटीत काय झालं, याबाबत माझ्याकडे माहिती आली आहे. त्यामुळे तुम्ही वेट अँड वॉच करा, असे त्यांनी म्हटले आहे.

राऊत पुढे म्हणाले की, मंत्र्यांचे केलेले खातेबदल ही थातूरमातूर कारवाई आहे. आरोपी मंत्री आणि त्यांचे बॉस आपल्या माणसांना वाचवण्याचा काही प्रयत्न करत आहेत. त्यासाठीच खातेबदलासारखे प्रकार केले जात आहेत. मात्र जनता, सामाजिक कार्यकर्त्यांवर काहीही फरक पडणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच याचं सगळं ओझं झालेले आहे. त्यांनाही हे ओझे उचलून फेकायचे आहे.

पान ८ वर

# अवघ्या 90 मिनिटांत मुंबईतून पुणे गाठा!

## लोकमान्य टिळक पुरस्कार सोहळ्यात गडकरींनी दाखवला नवा 'हायटेक महामार्ग'

प्रतिनिधी
पुणे

द्रुतगती महामार्ग म्हणजे एक्स्प्रेस वे बांधल्यानंतर मुंबई-पुणे अंतर केवळ तीन तासांवर येईल, अशी घोषणा फार वर्षांपूर्वी करण्यात आली होती. आजही मुंबई-पुणे प्रवासाला किमान साडेतीन ते चार तास लागत आहेत. असे असताना आता मुंबई-पुणे प्रवास अवघ्या दीड तासात पूर्ण होईल शकेल, अशी घोषणा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केली आहे. यंदाचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना प्रदान करण्याचा शुक्रवारी सोहळा पुण्यात झाला. यावेळी नितीन गडकरी मुंबई-पुणेकरांना नवी आशा दाखवली आहे.

पान ८ वर




### गडकरी परखड बोलणारे – फडणवीस

लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराने नितीन गडकरी यांचा गौरव केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी गडकरींचे तोंडभरून कौतुक केले आहे. राजकारणात सत्य माहीत असूनही ते बोलू नये, असे मानले जाते. कारण, त्यामुळे आपलेच नुकसान होत असते. मात्र, अशी परिस्थिती निर्माण झाली की गडकरी हमखास सत्यच बोलतात. कितीही नुकसान झाले तरी ते मनात आहे तेच बोलतात. गकरी कधीच सोयीचे किंवा राजकारणाला पटेल ते बोलत नाहीत. त्यांचा हाच स्पष्टवक्तेपणा लोकांना जास्त आवडतो, असे मुख्यमंत्री म्हणाले.

## अनिल अंबानींच्या अडचणीत वाढ
# ईडीने जारी केली 'लूकआऊट' नोटीस

प्रतिनिधी
मुंबई

उद्योगपती अनिल अंबानी यांच्या संबंधित ठिकाणी ईडीने काही दिवसांपूर्वी छापेमारी केली होती. त्यानंतर अनिल अंबानी यांना समन्सही बजावलं होतं. दरम्यान, आता अनिल अंबानी यांच्याविरोधात लूकआऊट नोटीस जारी करण्यात आली आहे. त्यामुळे अनिल अंबानी यांच्या अडचणी वाढल्या आहेत. ३ हजार कोटींच्या बँक कर्ज घोटाळ्याप्रकरणी अनिल अंबानी यांना ५ ऑगस्ट रोजी चौकशीसाठी ईडीने समन्स बजावलेले आहेत. त्यामुळे ५ ऑगस्ट रोजी अनिल अंबानी यांची चौकशी होण्याची शक्यता आहे.

२०१७ ते १९ या काळात येस बँकेकडून रिलायन्स अनिल धिरूभाई अंबानी ग्रुपच्या कंपन्यांना वेगवेगळ्या प्रमाणात एकूण ३ हजार कोटींची कर्जे वितरीत करण्यात आले होते. पण या सगळ्या व्यवहारात बेकायदेशीर बाबी घडल्याचा आरोप करण्यात आला आहे. या आरोपांची चौकशी ईडीकडून करण्यात येत आहे. ही कर्जाची रक्कम वळती करण्यासाठी बँकेच्या पदाधिकाऱ्यांना, प्रमोटर्सला लाच दिली गेल्याचा संशय ईडीला आहे. त्या पार्श्वभूमीवर ईडीकडून तपास केला जात आहे.

# एसटी महामंडळ आता पेट्रोल-डिझेलही विकणार

प्रतिनिधी
ठाणे

एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आणि उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण करण्यासाठी राज्यभरात व्यावसायिक तत्त्वावर पेट्रोल आणि डिझेल विक्री करणारे पंप सुरू करण्यात येणार आहे. ही महत्त्वपूर्ण माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. हा प्रकल्प केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त व्यावसायिक भागीदारीतून कार्यान्वित केला जाणार आहे.

याविषयी माहिती देताना मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, "एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती सध्या नाजूक आहे. केवळ प्रवासी तिकीट विक्रीवर अवलंबून न राहता उत्पन्नाचे नवे स्रोत निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. याच धोरणाचा भाग म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे."

एसटी महामंडळ गेल्या ७० वर्षांहून अधिक काळापासून इंडियन ऑइल आणि भारत पेट्रोलियम



यांसारख्या कंपन्यांकडून आपल्या बसेससाठी डिझेल खरेदी करत आहे. महामंडळाच्या स्वतःच्या मालकीच्या २५१ ठिकाणी केवळ एसटी बसेससाठी इंधन वितरणाचे पंप आहेत. त्यामुळे पेट्रोल पंप चालवण्याचा आणि त्याच्या देखभालीचा उत्तम अनुभव महामंडळाकडे आधीपासूनच आहे.

> भविष्यात व्यावसायिक इंधन विक्रीतून सर्वसामान्य ग्राहकाला विश्वासार्ह इंधन विक्री केंद्र एसटी महामंडळाच्या माध्यमातून उपलब्ध होईल, तसेच महामंडळाला देखील उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण होईल.
>
> **- प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री**

# मॅकडोनाल्ड्स, वॉलमार्टविरोधात अमेरिकेतील जनता रस्त्यावर

## संपूर्ण महिनाभर बहिष्कार...

वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

अमेरिकेतील दोन महाकाय कंपन्या, वॉलमार्ट आणि मॅकडोनाल्ड्स, यांच्याविरोधात देशव्यापी बहिष्काराची घोषणा करण्यात आली आहे. 'द पीपल्स युनियन यूएसए' या पुरोगामी गटाच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन 1 ऑगस्टपासून सुरू झाले असून, संपूर्ण महिनाभर चालणार आहे. कंपन्यांकडून होणारे कामगारांचे शोषण, करचुकवेगिरी आणि सामाजिक जबाबदारीचा अभाव या मुद्द्यांवरून अमेरिकन नागरिकांना या कंपन्यांवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

'द पीपल्स युनियन यूएसए'




या संघटनेने वॉलमार्ट आणि मॅकडोनाल्ड्सवर गंभीर आरोप केले आहेत. या आरोपांमुळेच अमेरिकन नागरिकांमध्ये असंतोष पसरला असून, त्यांनी या कंपन्यांच्या विरोधात भूमिका घेतली आहे.

या आंदोलनाचा मुख्य उद्देश मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांच्या मनमानी कारभाराला विरोध करणे आणि स्थानिक लहान व्यवसायांना प्रोत्साहन देणे हा आहे.'द पीपल्स युनियन यूएसए'चे संस्थापक जॉन श्वाई यांनी म्हटले आहे की, "कॉर्पोरेट कंपन्यांच्या अनियंत्रित सत्तेमुळे जे काही चुकीचे घडत आहे, वॉलमार्ट त्या सर्वांचे प्रतीक आहे."

या आंदोलनाचे नेतृत्व करणारे जॉन श्वाई सोशल मीडियावर प्रचंड लोकप्रिय आहेत. त्यांचे टिकटॉकवर 3 लाख 60 हजारांहून अधिक आणि इन्स्टाग्रामवर 5 लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत. याच सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर करून त्यांनी लोकांना या बहिष्कारासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.

श्वाई यांनी यापूर्वीही वॉलमार्ट, टार्गेट आणि ॲमेझॉन यांसारख्या कंपन्यांविरोधात DEI कार्यक्रम कमी केल्याच्या कारणावरून 'आर्थिक बहिष्कारा'ची हाक दिली होती. गेल्या महिन्यातही मॅकडोनाल्ड्सविरोधात एका आठवड्यासाठी बहिष्कार टाकण्याचे आवाहन करण्यात आले होते.

# 40 वर्षांच्या लढ्याला यश, कोल्हापूरला सर्किट बेंच मंजूर

## मुंबई हायकोर्टाचे नोटिफिकेशन प्रसिद्ध

प्रतिनिधी
कोल्हापूर

पश्चिम महाराष्ट्रातील लाखो नागरिकांसाठी दशकांहून अधिक काळ चाललेला संघर्ष अखेर फळाला आला आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच (खंडपीठ) कोल्हापुरात 18 ऑगस्ट 2025 पासून कार्यान्वित होणार असल्याची बहुप्रतिक्षित घोषणा मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांनी आज एका अधिसूचनेद्वारे केली.या ऐतिहासिक निर्णयामुळे कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, न्यायदानाचा मार्ग आता अधिक सुकर होणार आहे. दैनिक पुढारीने कोल्हापूर खंडपीठाचा प्रश्न अनेक वर्षांपासून लाऊन धरला होता.

कोल्हापुरात मुंबई हायकोर्टाचे सर्किट बेंच व्हावे या मागणीसाठी गेल्या ४० वर्षांपासून सुरु असलेल्या लढ्याला अखेर आज यश आले. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांनी आज शुक्रवार याबाबतचे नोटिफिकेशन प्रसिद्ध केले. यानिर्णयानंतर वकिलांनी कोल्हापुरात एकच जल्लोष केला. सर्किट बेंच मंजूर झाल्याने सहा जिल्ह्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

### मुंबईचा फेरा वाचणार

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून भूषण गवई यांची नियुक्ती झाल्यापासून खंडपीठ मंजुरीच्या प्रक्रियेला अधिक वेग आला होता. सर्किट बेंचमुळे कोल्हापूरच्या विकासाला गती येणार आहे. सहा जिल्ह्यांतील वकील आणि पक्षकारांचा ओघ वाढणार असल्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला गती मिळणार आहे. मुंबईला जाण्याचा फेरा वाचणार असल्याने पक्षकारांनाही याचा मोठा फायदा होणार आहे.


# राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांवर मराठीचा डंका

## श्यामची आई सर्वोत्कृष्ट

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

71 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार विजेत्यांची घोषणा शुक्रवारी 1 ऑगस्ट रोजी नवी दिल्लीतील राष्ट्रीय मीडिया सेंटरमध्ये करण्यात आली. या पुरस्कारांसाठी 1 जानेवारी 2023 ते 31 डिसेंबर 2023 दरम्यान CBFC (सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन) कडून प्रमाणपत्र मिळालेले चित्रपट पात्र होते. पठाण, ॲनिमल, 12th फेल, ओएमजी 2, रॉकी अँड रानी की प्रेम कहानी, द केरळ स्टोरी, आदिपुरुष यासारखे लोकप्रिय हिंदी चित्रपट या वर्षी प्रदर्शित झाले. तेलुगू चित्रपटसृष्टीत सीता रामम, मंथ ऑफ मधू, बालागम, दशहरा यासारखे चित्रपट प्रदर्शित झाले. तमिळ चित्रपटसृष्टीत जेलर आणि लिओसारखे चित्रपट मोठे ब्लॉकबस्टर ठरले.

दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांनी जाहीर केल्यानुसार भाषिक चित्रपटात मराठीमधून "श्यामची आई" चित्रपटाला सर्वोत्कृष्ट पुरस्कार देण्यात आला आहे. तर विक्रांत मेस्सी अभिनीत 12th फेल चित्रपट राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट ठरला आहे. तर अभिनेता शाहरुख खान याला 'जवान' चित्रपटासाठी आणि अभिनेता विक्रांत मेस्सीला '12th फेल' चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.









### शाहरुख खान,विक्रांत मेस्सी 'सर्वोकृष्ट अभिनेते', राणी मुखर्जी 'सर्वोत्कृष्ट अभिनेत्री'

**राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार विजेता...**

- सर्वोत्कृष्ट डॉक्युमेंट्री – गॉड वल्चर अँड ह्युमन
- सर्वोत्कृष्ट कल्चरल फिल्म – टाइमलेस तमिळनाडू
- सर्वोत्कृष्ट तेलुगू फिल्म – भागावान्थ केसरी
- सर्वोत्कृष्ट तमिळ फिल्म – पार्किंग
- सर्वोत्कृष्ट पंजाबी फिल्म – गॉडडे गॉडडे चा
- सर्वोत्कृष्ट मराठी सिनेमा – श्यामची आई
- सर्वोत्कृष्ट हिंदी सिनेमा – कथल
- सर्वोत्कृष्ट गुजराती सिनेमा – वश
- सर्वोत्कृष्ट बंगाली सिनेमा – डीप फ्रीजर
- सर्वोत्कृष्ट ॲक्शन सिनेमा – हनूमान
- सर्वोत्कृष्ट कोरिओग्राफी – वैभवी मर्चंट (रॉकी और रानी की प्रेम कहाणी)
- सर्वोत्कृष्ट म्यूझिक दिग्दर्शक – हर्षवर्धन रामेश्वर (ॲनिमल सिनेमा)
- सर्वोत्कृष्ट साऊंड डिझाइन – ॲनिमल
- सर्वोत्कृष्ट सिनेमॅटोग्राफर – प्रसन्नता मोहपात्रा (द केरला स्टोरी)
- सर्वोत्कृष्ट प्लेबॅक सिंगर फिमेल – शिल्पा राव
- सर्वोत्कृष्ट मराठी बालकलाकार – कबीर कंढरे (जिप्सी), त्रिशा ठोसर श्रीनिवास पोकले आणि भार्गव
- सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री – उर्वशी, जानकी बोडीवाला
- सर्वोत्कृष्ट अभिनेत्री – राणी मुखर्जी
- सर्वोत्कृष्ट अभिनेता – शाहरुख खान(जवान) आणि विक्रांत मेसी (12th फेल )
- सर्वोत्कृष्ट लहान मुलांचा सिनेमा – नाळ 2
- सर्वोत्कृष्ट डेब्यू फिल्म दिग्दर्शक – आशीष भेंडे (आत्मपॅम्फलेट)
- सर्वोत्कृष्ट फिचर फिल्म – 12th फेल

३ वृत्तमानस मुंबई
मुंबई, शनिवार, २ ऑगस्ट २०२५

## मालेगाव बॉम्बस्फोट : निर्दोषांना न्याय मिळवून देणाऱ्या वकिलाचा गोपाळ शेट्टींकडून सत्कार

**मुंबई :** मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात आरोपी असलेल्या साध्वी प्रज्ञा सिंह आणि कर्नल प्रसाद पुरोहित यांना न्यायालयाने निर्दोष मुक्त केले आहे. गेल्या १७ वर्षांपासून न्यायालयासमोर संपूर्ण सत्य ठामपणे मांडणारे आणि निर्दोषांना न्याय मिळवून देणारे ज्येष्ठ वकील ॲड. जयप्रकाश मिश्रा यांचे भारतीय जनता पक्षाचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी त्यांचा शाल, नारळ, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. याप्रसंगी माजी जिल्हाध्यक्ष गणेश खणकर, विद्यमान जिल्हाध्यक्ष दीपक उर्फ बाळा तावडे, आर.यू. सिंह, श्रीकांत पांडे, अशोक शहा, ॲड. अमरेंद्र मिश्रा आणि माजी नगरसेवक जगदीश ओझा यांच्यासह अनेक अधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



### कोकाटेंना दणका बसताच शिंदेंचे मंत्री 'अलर्ट'

# योगेश कदमांकडून 'सावली'चा परवाना सरेंडर

**प्रतिनिधी**
■ मुंबई

वादग्रस्त वक्तव्य आणि विधीमंडळात मोबाईलवर पत्ते खेळणाऱ्या माणिकराव कोकाटेंकडून कृषिमंत्रीपद काढून घेण्यात आले आहे. त्यांच्याकडे क्रिडा खात्याची जबाबदारी देण्यात आले आहे. त्यामुळे एकनाथ शिंदेंच्या वादग्रस्त मंत्र्यांवर काय कारवाई होणार याची चर्चा होती. त्यातच गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या आईच्या नावावर असलेल्या सावली बारवर मोठी कारवाई करण्यात आली आहे. कदम यांनी आपल्या बारचा परवाना सरेंडर केल्यावर पोलिसांनी तो रद्द केला आहे.

'सावली बार'चे लायसन्स योगेश कदम यांच्याकडून सरेंडर करण्यात आले आहे. लायसन्स सरेंडर केल्यानंतर ते रद्द करण्याचा निर्णय घेण्यातआला. योगेश कदम यांच्या आईंच्या नावानं ऑर्केस्ट्रा बारचे लायसन्स असल्यामुळे त्यांचे गृहराज्यमंत्रीपद अडचणीत आले होते. मात्र, केवळ बारचे लायसन्स रद्द केल्याने त्यांचे मंत्रिपद वाचल्याची चर्चा आहे.

गृहराज्यमंत्र्याच्या आईच्या नावावर बारचे लायसन्स असल्याचा प्रश्न आमदार अनिल परब यांनी विधीमंडळात उपस्थित केला होता. यासंदर्भात त्यांनी कागदपत्रे देखील दाखवली होती. मुख्यमंत्र्यांनी योगेश कदम यांचा राजीनामा घ्यावा म्हणून परब आक्रमक झाले होते.

योगेश कदम यांचे वडील माजी मंत्री रामदास कदम यांनी या बारविषयी स्पष्टीकरण देताना बारचे लायसन्स आपल्या पत्नीच्या नावे असले तरी तो बार आपण चालवत नसल्याचे स्पष्ट केले तसेच हा बार शेट्टी नावाच्या व्यक्तीला भाड्याने दिल्याचे देखील त्यांनी सांगितले होते. दरम्यान, या बारवर आरोप केल्यापासून तो बंद ठेवण्यात आला होता. आता जो व्यक्ती बार भाड्याने चालवत होता त्याच्यासोबतचा करार देखील रद्द करण्यात आला आहे.

**पोलिसांनी केले बारचे लायसन्स रद्द**




**उपमुख्यमंत्री शिंदेंकडून कदमांना पाठींबा**

सावली बारवरून योगेश कदम यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्यासाठी विरोधक आक्रमक होते. मात्र, कोकणात गुहागर मतदारसंघात झालेल्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी योगेश मी तुझ्या पाठीशी आहे, असे म्हणत योगेश कदम यांना पाठींबा दिला होता. मात्र, आता डॅमेज कंट्रोलसाठी सावली ऑर्केस्ट्रा बारचा परवाना सरेंडर करण्यात आला असल्याची माहिती आहे.

# 'म्हाडा'तही झोपु प्राधिकरणाच्या धर्तीवर 'शिखर तक्रार निवारण समिती'

### राज्याच्या गृहनिर्माण धोरणात शिक्कामोर्तब

**प्रतिनिधी**
■ मुंबई

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातही(म्हाडा) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या धर्तीवर शिखर तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात येणार आहे. या प्रस्तावावर गृहनिर्माण धोरणात शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.

सध्या 'झोपु' प्राधिकरणाशी संबंधित सर्व अपीलांची सुनावणी शिखर तक्रार निवारण समितीपुढे होते. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली होती. झोपडपट्टी पुनर्विकासाबाबत कुठलीही तक्रार आली तर उच्च न्यायालय किंवा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ती या समितीकडे पाठवितो. गृहनिर्माण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव या समितीच्या प्रमुख असून म्हाडाचे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपु प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिकेचे आणि मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त सदस्य आहेत. या समितीपुढे झोपु प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच प्राधिकरणात कुठल्याही थरावर देण्यात आलेल्या आदेशाविरुद्ध अपील सादर करता येते. या समितीच्या आदेशानंतर समाधान न झाल्यास तक्रारदाराला उच्च न्यायालयात धाव घेता येते.

"...म्हाडातही उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच मुंबई गृहनिर्माण मंडळ, इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ आणि मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळात एखादा निर्णय विरोधात गेला तर तक्रारदार थेट उच्च न्यायालयात धाव घेतो. या निर्णयांना आव्हान देणारी कुठलीही यंत्रणा नसल्यामुळे उच्च न्यायालयाकडूनही विविध प्रकरणात सुनावणी होते. परंतु त्यामुळे प्रत्यक्षात विलंब लागत असल्यामुळे तक्रारदारही हैराण होतो. अशावेळी म्हाडातही झोपु प्राधिकरणाच्या धर्तीवर शिखर तक्रार निवारण समिती असावी किंवा झोपुतील विद्यमान समितीची कार्यकक्षा वाढवावी, असा उल्लेख गृहनिर्माण धोरणाच्या मसुद्यात करण्यात आला होता. मात्र म्हाडासाठी आता स्वतंत्र शिखर तक्रार निवारण समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**समितीचे प्रमुख अतिरिक्त अथवा प्रधान गृहनिर्माण सचिव**

यानुसार समितीचे अध्यक्ष हे गृहनिर्माण विभागाचे अतिरिक्त मुख्य किंवा प्रधान सचिव असतील. याशिवाय मुंबई गृहनिर्माण तसेच मुंबई इमारत दुरुस्ती मंडळाचे मुख्य अधिकारी, महापालिका व मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त, गृहनिर्माण विभागाचे उपसचिव हे सदस्य तर अवर सचिव सदस्य सचिव असतील. म्हाडा पुनर्विकासाबाबत कुठलेही आदेश पारीत झाले असतील तर या समितीपुढे दाद मागता येईल. पात्रता, भाडे थकबाकी, रखडलेला पुनर्विकास तसेच म्हाडा कायदा ७९-अ व ९१-अ अन्वये पारित आदेशांबाबतही समितीत दाद मागता येणार आहे.

# बेस्ट उपक्रमासाठी कायमस्वरूपी, पूर्ण वेळ महाव्यवस्थापक हवेत

### सुहास सामंत यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**प्रतिनिधी**
■ मुंबई

बेस्ट उपक्रमाचे अर्धवेळ महाव्यवस्थापक एस व्हि आर श्रीनिवास हे गुरुवारी सेवानिवृत्त झाले पण त्यांच्या जागी अन्य सनदी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बेस्ट उपक्रमासाठी कायमस्वरूपी, पूर्ण वेळ महाव्यवस्थापकांची नियुक्ती करावी अशी विनंती बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष सुहास सामंत यांनी केली आहे.

बेस्ट उपक्रम हा आशिया खंडातील नावाजलेला परिवहन आणि विद्युत पुरवठा सेवा देणारा उपक्रम आहे. मुंबईवर येणा-या प्रत्येक संकटात बेस्टचा कर्मचारी हा अग्रेसर होऊन काम करीत असतो.सद्या बेस्टला मोठ्या प्रमाणात आर्थिक घरघर लागली असून, गेली कित्येक वर्ष नोकरभरती झालेली नाही. खाजगीकरणामुळे बेस्ट धोक्यात येत आहे. त्यामुळे बेस्टचे नाव खराब होत चालले आहे.

युनियन म्हणून काम करत असताना बेस्टच्या कर्मचारी वर्गाच्या समस्या अनेक धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी बेस्टला पूर्वीप्रमाणे पूर्ण वेळ देणारे, कायमस्वरूपी महाव्यवस्थापक देणे आवश्यक आहे. तेव्हाच बेस्ट उपक्रमातील व्यथा त्यांना माहिती पडतील आणि त्या सरकार दरबारी मांडण्यासाठी त्यांना यश येईल. या बाबीचा योग्य तो विचार करून बेस्टला पुनर्जीवन देण्यासाठी कायमस्वरूपी, पूर्ण वेळ देणारे महाव्यवस्थापक यावे असे सुहास सामंत यांनी पत्रात म्हटले आहे.

# सरकारने गरीब भाडेकरूंना न्याय द्यावा!

### पागडी एकता संघाचे अध्यक्ष मुकेश शाहांची मागणी

■ मुंबई

मुंबईतील पगडीधारक कुटुंबं म्हणजे या शहराचा खरा प्राण. यांनी या शहराची सेवा केली, कर भरला, आणि मुंबईचा सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक पाया उभा केला. मात्र आज हेच कुटुंबं ८०-१०० वर्ष जुन्या, धोकादायक आणि मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये अंधारात जीवन जगत आहेत. अनेक इमारतींमध्ये शौचालय नाही, पाणी अपुरं, वीज कमकुवत, आणि सुरक्षिततेचा पूर्ण अभाव आहे. या नागरिकांची एकच आशा होती की सुरक्षित पुनर्विकास होऊन गरीब भाडे करून न्याय मिळेल. मात्र ही आशा आता निराशा होते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे . मुख्यमंत्री आणि गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे तात्काळ हस्तक्षेपाची आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी लेखी पत्रद्वारे केली आहे. आज जर सरकारने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिलं नाही, तर या शहराचा खरा कणा असलेला मध्यमवर्ग या शहरातून निघून जाईल.ही केवळ इमारतींची लढाई नाही , ही अस्तित्वाची लढाई आहे. त्यामुळे शासनाने पांगळी कुटुंबीयांच्या इमारतींचे प्रश्न त्वरित सोडवावा आणि त्यांचा पुनर्विकास त्वरित करावा. अन्यथा इथं काही दिवसातच आम्ही एवढे आंदोलन पुकारण्यात असल्याची माहिती पागडी एकता संघाचे अध्यक्ष मुकेश शहा यांनी दिली.

**मुंबई :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त मंत्रालयात कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, उपसचिव दिलीप देशपांडे, सहायक कक्ष अधिकारी राजेंद्र बच्छाव, विजय शिंदे आदींसह मंत्रालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.



# सैनिक फेडरेशन महाराष्ट्र राज्यतर्फे कारगिल विजयी दिवस सोहळा साजरा

### सैनिकांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यास सरकार कटीबद्ध प्रवीण दरेकर यांचे आश्वासन

**प्रतिनिधी**
■ मुंबई

सैनिक फेडरेशन महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून शहीद स्मारक, फोर्ट, येथे कारगिल विजयी दिवस सोहळा आयोजित करण्यात आला होता, हा कार्यक्रम शेकडो माजी व सैनिक परिवार आणि देशभक्त नागरिकांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला.

२६ जुलै १९९९ ला झालेल्या करगील युद्धाला २६ वर्ष पूर्ण झाली या युद्धामध्ये ५२७ भारतीय सैनिकांनी मातृभूमीसाठी अधम्य साहस आणि कर्तव्य परायणतेचा परिचय देत आपले सर्वोच्च बलिदान दिले. २६ जुलै या दिवशी सैनिक फेडरेशनची स्थापना ही झाली होती. सैनिक फेडरेशनचा वर्धापन दिन आणि कारगिल विजय दिवस राष्ट्रभक्तीच्या मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला या युद्धात शहीद जवानांना मानवंदना देण्यात आली आणि शहिदांच्या परिवाराच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आल्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार ब्रिगेडियर सुधीर सावंत हे होते तसेच कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रवीण दरेकर, कर्नल डी. राजा, आमदार सौ. मनीषा कायंदे, सामाजिक कार्यकर्त्या शायना एन.सी., निवासी जिल्हाधिकारी, राष्ट्रपती पुरस्कार विजेते अभिनेते अरुण नलवडे, अडिशनल कमिशनर समीर वानखेडे त्यांची पत्नी अभिनेत्री क्रांती रेडेकर, जय भीम आर्मी अध्यक्ष नितीन मोरे, शिवराज्य ब्रिगेड अध्यक्ष अमोल जाधवराव, मुंबई विद्यापीठ माजी प्राचार्य दिलीप पाटील, बेडेकर लोणच्याच्या अध्यक्षा अनघा बेडेकर आदी उपस्थित होते. यावेळी आमदार प्रवीण दरेकर यांनी आपल्या भाषणात मुंबईत सैनिकांसाठी सर्व सुविधायुक्त भव्य असे सैनिक भवन उभारण्याचा संकल्प व्यक्त केला सैनिकांच्या अनेक मागण्या प्रलंबित आहेत आणि त्यासाठी सरकार कटीबद्ध आहे आणि लवकरच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत बैठक लावण्याचे आश्वासन त्यांनी दिले.




ब्रिगेडियर सुधीर सावंत यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सैनिक फेडरेशन ने सैनिकांसाठी केलेल्या कामांची माहिती उपस्थित सैनिक आणि परिवाराला दिली सर्व सैनिकांनी एकत्र येण्याचे आणि सैनिकांच्या भल्यासाठी काम करण्याचे आवाहन केले. या प्रसंगी सैनिक फेडरेशन चे जन-सेक्रेटरी सुभेदार निंबाळकर यांनी सूत्रसंचालन केले व शेवटी उपाध्यक्ष सुभेदार सुभाष दरेकर यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. याप्रसंगी सैनिक फेडरेशन मुंबई अध्यक्ष फ्लेचर पटेल, कॅप्टन सुभाष चव्हाण राज्य सचिव, रवींद्र घनबहादुर सचिव, आदिसह मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, अकोला, वाशिम, अमरावती, सातारा, कोल्हापूर, आणि नवी मुंबई जिल्ह्यांतील सैनिक फेडरेशनचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आजारपणाला कंटाळून महिलेने केली बाळाची हत्या

**मुंबई:** शिवाजीनगर येथील बैंगनवाडी परिसरातील एका ४३ वर्षीय महिलेने आजारपण आणि गरीबीला कंटाळून आपल्या सहा महिन्यांच्या बाळाची उशीने तोंड दाबून व गळा आवळून हत्या केली. शिवाजीनगर पोलिसांनी आरोपी महिलेला अटक करून तिच्या विरोधात हत्येचा गुन्हा नोंदवला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चेंबूर येथील पी. एल. लोखंडे मार्गावरील कारखान्याबाहेर एका महिलेने दुसऱ्या महिलावर चाकूने हल्ला केल्याची माहिती टिळकनगर पोलिसांच्या निर्भया पथकाला गुरुवारी संध्याकाळी मिळाली. पोलीस निरीक्षक मनिषा कुलकर्णी आणि त्यांच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि दोन्ही महिलांना चौकशीसाठी ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले.


## नवी मुंबई महानगरपालिका

**शहर अभियंता विभाग**

**निविदा सुचना क्र./श.अ/का.अ.(ऐरोली)/140/2025-26**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | ऐरोली येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या जवळीलवस्तुसंग्रहालयामध्ये स्थापत्य कामे करणे आमदार स्थानिक विकास ) कार्यक्रम2024-25). | रु.40,60,041/- |
| 2 | ऐरोली विभागातील सेक्टर 3 येथील भुयारी मार्गाची सुधारणा करणे. | रु.50,86,651/- |
| 3 | ऐरोली विभागातील से.9 दिवागाव मुळ गावठाणामधील विविध ठिकाणचे गटर व पदपथांची दुरुस्ती करुन सुधारणा करणे | रु.1,48,66,470/- |
| 4 | रोली विभागातील से.4 येथील दुर्गामंदिर ते सुशिलाबाई देशमुख विद्यालय )SDV) आणि T,P,M ग्रुप वसाहत या ठिकाणच्या मलनिसारण वाहिन्या टाकण्याकरीता : खोदलेल्या चरांची पुर्नस्थापना करणे. | रु.56,23,243/- |
| 5 | ऐरोली विभागातील से.4 येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिर ते पोलीस मित्र वसाहत आणि U ग्रुप वसाहत या ठिकाणच्या मलनिसारण : वाहिन्या टाकण्याकरीता खोदलेल्या चरांची पुर्नस्थापना करणे. | रु.66,47,355/- |

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि.02/08/2025 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in यासंकेत स्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा (E-tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिकअडचणींसाठीसदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संपर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखुन ठेवलेला आहे..**

सही/-
(शिरीष आरदवाड)
शहर अभियंता
नवी मुंबई महानगरपालिका

जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/336/2025



## मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड

**निविदे करिता विनंती: MRVC-W-304-OHE-KYN-BUD**

**(सिंगल टप्पा दोन लिफाफा ई-खरेदी निविदा प्रक्रिया)**

मुंबई रेलवे विकास कॉर्पोरेशन लि. (एमआरवीसी) ज्यांचे कॉर्पोरेट कार्यालय दुसरा मजला, चर्चगेट स्टेशन इमारत, मुंबई-४०००२० येथे आहे, यांचे द्वारे **"मध्य रेल्वेच्या कल्याण-बदलापूर (चेनेज ५४८०० मीटर - ६९४०० मीटर) दरम्यानच्या २५ केव्ही ओएचई कामांच्या डिझाइन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कमिशनिंग. हे काम कल्याण-बदलापूर दरम्यानच्या तिसऱ्या आणि चौथ्या मार्गाच्या संदर्भात आहे"** या साठी ई-निविदा मागवत आहे. निविदा आणि निविदा कागदपत्रांची तपशीलवार माहिती I R E P S वेबसाइट www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे. www.ireps.gov.in वेबसाइटवर संपूर्ण ई-निविदा सादर करण्याची **अंतिम तारीख २९.०८.२०२५ दुपारी १५:०० वाजेपर्यंत आहे. शुद्धीपत्र, जर असेल, तर ते फक्त वेबसाइट वर प्रसिद्ध करण्यात येईल.**

SNP 03



## NEXT MEDIAWORKS LIMITED

**नोंदणीकृत कार्यालय : युनिट ७०१ ए, ७ वा मजला, टॉवर-२, इंडियाबुल्स फायनान्स सेंटर, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन रोड, मुंबई - ४०००१३,**
**ई-मेल: investor.communication@radioone.in संकेतस्थळ : www.nextmediawoks.com दूरध्वनी: +९१-२२-४४१० ४१०४**

**जून ३०, २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी अलेखापरीक्षित एकत्रिकृत वित्तीय निष्कर्षांचा अहवाल**

(प्रती सम भाग माहिती वगळता आयएनआर लाखांमध्ये)

| तपशिल | संपलेले त्रैमासिक | | | संपलेलं वर्ष |
|---|---|---|---|---|
| | जून ३०, २०२५ | मार्च ३१, २०२५ (संदर्भ टिप ३) | जून ३०, २०२४ | मार्च ३१, २०२५ |
| | (अलेखापरीक्षित) | (लेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (लेखापरीक्षित) |
| कार्यामधून महसूल | - | - | - | - |
| अपवादात्मक बाबी आणि कर पूर्व तोटा | (११७) | (१२९) | (१३१) | (४८८) |
| अपवादात्मक बाबी आणि कर पश्चात तोटा | (११७) | ७५३ | (१३१) | ३९४ |
| कालावधीसाठी अनियंत्रित व्याजापश्चात तोटा (अपवादात्मक बाबीनंतर) | (११७) | ७५३ | (१३१) | ३९४ |
| अनियंत्रित व्याजापश्चात एकूण व्यापक तोटा | (११७) | ६८३ | (१३१) | ३२४ |
| भरणा केलेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य – आयएनआर १०/- प्रती समभाग) | ६,६८९ | ६,६८९ | ६,६८९ | ६,६८९ |
| लेखा परीक्षित ताळेबंदानुसार राखीव महसूल वळगता अन्य भाग धारणा | | | | (९,१८८) |
| प्रती समभाग तोटा | वार्षिकीकरण केलेले नाही | वार्षिकीकरण केलेले नाही | वार्षिकीकरण केलेले नाही | |
| मूळ आणि सौम्यीकृत | (०.१७) | १.१३ | (०.२०) | ०५९ |

टिप: सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिसक्लोझर रिक्वायरमेंटस) नियमावली, २०१५ ("सेबी एलओडीआर") च्या नियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजमध्ये सादर करण्याचा उपरोक्त हा त्रैमासिक वित्तिय निष्कर्षाचा तपशिलवार आराखडा आहे.

www.nseindia.com www.bseindia.com www.nextmediaworks.com

**टिपा:**

१ जून ३०, २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी वरील अलिखित आर्थिक निकालांचे पुनरावलोकन करण्यात आले आणि त्यांची शिफारस लेखापरीक्षण समितीने केली आणि १ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित बैठकींमध्ये संचालक मंडळाने त्यांना मान्यता दिली. कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी सुधारित केलेल्या सेबी (एलओडीआर) च्या नियम ३३ नुसार वरील निकालांचा "मर्यादित आढावा" घेतला आहे आणि एक असुधारित पुनरावलोकन निष्कर्ष जारी केला आहे.

२ अलिखित आर्थिक निकाल कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत विहित केलेल्या भारतीय लेखा मानकांनुसार ('इंड-एएस') तयार केले आहेत जे वेळोवेळी सुधारित केलेल्या कंपन्या (भारतीय लेखा मानके) नियमांसह वाचले जातात.

३. ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीचे आकडे आर्थिक वर्षाच्या संदर्भात लेखापरीक्षित आकडे आणि ३१ डिसेंबर २०२४ पर्यंतच्या वर्षाच्या आजपर्यंतच्या आकड्यांमधील संतुलन साधणारे आहेत, कारण हा आर्थिक वर्षाचा तिसरा तिमाही संपला होता, ज्यांचा मर्यादित आढावा घेण्यात आला होता.

४. कंपनीला ७ फेब्रुवारी २०२५ पासून 'इंड एएस ११० एकत्रित वित्तीय विवरणपत्रे' नुसार एकत्रित वित्तीय तयार करण्याची आवश्यकता नाही.

**संचालक मंडळाच्या करिता आणि वतीने**

**ठिकाण: नवी दिल्ली**
**दिनांक: ऑगस्ट ०१, २०२५**

**समीर सिंग**
**अध्यक्ष,**
**डीआयएन: ०८१३८४६५**



## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

**(म्हाडा घटक)**

म्हाडा MHADA

कार्यकारी अभियंता/ग- उत्तर विभाग यांचे कार्यालय, सोनावाला इमारत शं. आ. पालव मार्ग, दादर मुंबई - ४०० ०१४.

निविदा सुचना-०८ (तिसरी बोली)

कार्यकारी अभियंता ग(उत्तर) विभाग, मुं.इ. दु. वपु.मंडळ, यांच्या कार्यालया मार्फत खालील दर्शविलेल्या कामाकरीता म्हाडा / मुं.म.पा./ सा.बां. विभाग / कें.सा.बां.वि./ रेल्वे / बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र कंत्राटदाराकडून खालील कामाच्या मोहरबंद बी- १ (टक्केवारीदर) निविदा मागविण्यांत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम ₹ | इसारा रक्कम ₹ | सुरक्षा अनामत | कोऱ्या निविदेची रक्कम (विनापरतावा) (१८% जीएसटी सह) | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्विकृतीची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | ठेकेदारांचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | ग- उत्तर विभागातील इमारत क्र. २५५- एल, ऊर्दू स्कूल धारावी क्रॉस रोड, धारावी मुंबई या इमारतीची संरचनात्मक दुरुस्ती करणे. (मंडळ निधीचे काम) | ५,७६, २०८/- | ५७६२/- | १२०००/- | ५९०/- | दि.०४.०८.२०२५ ते दि. ११.०८.२०२५ सकाळी १०.३० ते दु. १.०० पर्यंत | दि. १२.०८. २०२५ ते दि.१३.०८.२०२५ सकाळी १०.३० ते दु. १.०० पर्यंत | १५ महिने | वर्ग -७ व त्यावरील |

१. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमती पेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युन्तम देकार सादर करणाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम निविदा उघल्याचा दिनांकापासुन ८ दिवसांच्या आत भरली नाहीतर द्वितीय न्युनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करुन त्यांनी प्रथम न्युनमत पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असले तर त्याची निविदा मंजुर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कमेबाबत सविस्तर निविदा सुचना पहावी.
२. कोऱ्या निविदा म्हाडा / मुं.म.पा./ सा.बां. विभाग/ कें. सा.बां.वि./ रेल्वे / बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या पॅन कार्ड व पुर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र यांच्या छायांकीत प्रमाणित केलेल्या प्रत सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
३. म्हाडामध्ये नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरताना ते कुठल्याही सरकारी / निमसरकारी संस्थेमध्ये काळ्या यादीत नाव समाविष्ठ नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
४. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले सादर करावे.
५. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेडयुल बँकेच्या १वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी मुं.इ. दु. वपु . मंडळ यांच्या नांवावर द्यावी.
६. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंताग (उ) विभाग, मुं.इ. दु. वपु . मंडळ, सोनावाला बिल्डींग, तळ मजला, ८, एस. ए. पालव मार्ग, शिंदेवाडी, दादर (पूर्व), मुंबई - १४. यांचेकडून रकाना क्र. ६ मध्ये विहीत केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे कोऱ्या निविदांची विक्री केली जाईल व सिलबंद निविदा याच कार्यालयात रकानाक्र. ७ प्रमाणे स्विकृती केली जाईल. तसेच स्विकृत केलेल्या मोहरबंद निविदा शक्य झाल्यास रकाना क्र. ८ मधील शेवटच्या दिवशी कार्यकारी अभियंता ( ग / उ) विभाग, मुं.इ. दु. वपु.मंडळ, यांच्या कार्यालयात दुपारी ४.०० वा. उघडल्या जातील.
७. संयुक्त बोलीदाराची बोली स्विकारली जाणार नाही.
८. या कामासाठी अशाच प्रकारच्या इमारत बांधकामचा / वास्तुबांधकामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असलेला अभियंता (सिव्हिल इंजिनियर) आणि इतर आवश्यक देखरेख अधिकारी ठेकेदाराकडे असणे आवश्यक आहे. ९. उप- ठेकेदाराचा अनुभव आणि त्यांच्याकडील साधने / साधनसंपती विचारात घेतली जाणार नाही.
१०. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्यांचे अधिकार सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यात येत आहे. जी. एस. टी. ची अदायगी स्विकृत करारनामा मुल्यावर होईल.
११. मागविण्यात आलेली निविदा अस्तित्वात असलेल्या एस एस आर दरावर आधारीत आहेत. जी. एस. टी. ची अदायगी शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार करण्यात येईल.
१२. जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.
१३. कोऱ्या निविदेची रक्कम मुख्य लेखाधिकारी / मु. इ. दु.व पु. मं. यांच्या बँक ऑफ महाराष्ट्र मधील खाते क्र.६०३२२०४०२८१ वर भराणा करुन पावती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

CPRO/A/630

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

Follow us:@mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता / ग- उत्तर
मुं.इ. दु. व पु. मं. मुंबई

ध्येय्य एवढं मोठं हवं की समोर येणाऱ्या अडचणी फिक्या पडल्या पाहिजेत.



- ग्रँट कार्डोन
अमेरिकन उद्योगपती आणि लेखक

वृत्तमानस
मुंबई, शनिवार, २ ऑगस्ट २०२५

# कुपोषणाचे चक्र भेदा

आधी भागांतील बालकांमधील कुपोषण आणि मातामृत्यू दर कमी करण्यासाठी गेली अनेक वर्षे व्यापक प्रयत्न सुरू असले तरी त्याला म्हणावे तसे यश येताना दिसत नाही ही वस्तुस्थिती आहे. बालमृत्यूंचे एक महत्त्वाचे कारण कुपोषण किंवा बाळाची उपासमार असते. बाल-कुपोषणाने बाळाची रोगप्रतिकारशक्ती कमी होते. त्यामुळे लवकर आजार होतात. पण ते लवकर बरे होत नाहीत. आजारांमुळे कुपोषण वाढते. असे मूल दगावण्याची शक्यता असते. याचे मूळ कारण कुपोषण व तात्कालिक कारण असते. देशभरात अर्भक, बालक आणि मातांचे मृत्यू रोखण्यासाठीचे प्रयत्न फोल ठरले आहेत. गंभीर बाब म्हणजे जगातील बालमृत्यूंपैकी एक चतुर्थांश बालमृत्यू आपल्या देशात होत असून यात अठ्ठावीस दिवसांखालील बालकांचे मृत्यूचे प्रमाण सर्वाधिक आहे. नवजात बालकांचा मृत्यूदरही धोक्याच्या पातळीवर आहे. महाराष्ट्रापुरता विचार करायचा तर राज्यात गेल्या पाच वर्षांत बालमृत्यूच्या प्रमाणात किंचितशी घट झाली आहे. कमी पोषण, उंचीच्या तुलनेत कमी वजन, पाच वर्षांखालील मुलांचे उंचीच्या तुलनेत कमी वजन, मुलांची वाढ खुंटणे, कुपोषण, बालमृत्यू दर, पाच वर्षांखालील मुलांचा मृत्यू दर हे घटक यात विचारात घेतले जातात. जगभरातील स्थिती मध्यम असल्याचा उल्लेख जागतिक कुपोषण निर्देशांकात करण्यात आला असून जगभरातील ६० कोटींहून अधिक लोक कुपोषित असल्याचा इशारा देण्यात आला आहे. देशातील भुकेच्या स्थितीवरून देशांना ० ते १०० असे गुण दिले जातात. त्यानुसार त्यांची क्रमवारी ठरवली जाते. यामध्ये ० गुण हे सर्वोत्तम समजले जातात, याचा अर्थ एकप्रकारे त्या देशात भुकेची स्थिती काळजी करण्यासारखी नाही असाच होतो. भारताला ५० पैकी २७.२ गुण देण्यात आले असून परिस्थिती गंभीर असल्याचं सांगण्यात आलं आहे. ९.९ पेक्षा कमी गुण असल्यास परिस्थिती गंभीर नाही. १० ते १९.९ मध्ये गुण असल्यास परिस्थिती मध्यम आहे. २० ते ३४.९ गुण असल्यास भुकेची परिस्थिती गंभीर आहे. ३५ ते ३९.९ गुण म्हणजे धोक्याची घंटा तर ५० हून अधिक गुण म्हणजे धोका खूप वाढला असून परिस्थिती भयावह आहे असा अर्थ होतो. सध्यातरी भारताची कामगिरी तुलनेत सुधारली आहे. एका माहितीनुसार भारतातील २२ राज्यांपैकी १३ राज्यांत बालकांची वाढ खुंटण्याचं प्रमाण वाढले आहे. देशाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात १५.३ टक्के कुपोषणाचं प्रमाण आहे. पाच वर्षांखालील १७.३ टक्के बालकांचं वजन त्यांच्या उंचीच्या मानाने कमी आहे. वयाच्या मानाने कमी उंची असणारी, म्हणजेच वाढ खुरटलेली अशी ३४.७टक्के बालकं आहेत. भारतात जन्माला येणाऱ्या दर शंभर मुलांपैकी जवळपास वीस मुलांच्या मेंदूची आणि शरीराची वाढ कुपोषणामुळे कायमची खुंटते. हे प्रमाण जगात सर्वाधिक आहे. ही भारताची पुढची पिढी आहे. अंगणवाडी, घरच्या घरी नवजात बालकांची काळजी, राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रम, निमियामुक्त भारत, जननी सुरक्षा योजना, मानव विकास कार्यक्रम, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, नवसंजीवनी अशा अनेक योजना आहेत. त्या बळकट करायला हव्यात. पण भूक किंवा कुपोषण दूर करायला निव्वळ या योजना कशा पुरणार? पोषण आहारासाठी लोकांना अन्नधान्य, भाजीपाला घेणं परवडणं, त्यांची क्रयशक्ती वाढणं म्हणजे त्यांच्या हाती पैसा खेळणं, हे सर्वात महत्त्वाचे ठरले आहे. तांदळाची सर्वांत मोठी निर्यात करणारा आपला देश. दूध व इतर अनेक खाद्यान्नांच्या उत्पादनात भारत पुढे आहे. तरी प्रत्येक भारतीयाला पोषण आहार, दोन वेळा पोटभर जेवण आजही मिळत नाही. धान्योत्पादन आणि साठा असूनही, धान्याच्या किंमती चढ्या राहाणं, हेही उपासमारीचे एक कारण. पालघर जिल्हा निर्मितीपासून बालमृत्यू आणि माता मृत्यूचे प्रमाण सातत्याने वाढत असून गेल्या अकरा वर्षात ४ हजार किमान २५ बालमृत्यू झाले असून १४९ मातांचा मृत्यू झाला आहे. या मृत्यूला कुपोषणासह विविध कारणे जबाबदार आहेत. गेल्या ११ वर्षात हे बालमृत्यू आणि मातामृत्यू झाले असले तरी गेल्या तीन वर्षात पालघर जिल्ह्यातील मृत्यूंचा आलेख कमी होत चालला आहे ही समाधानाची बाब मानावी. जिल्ह्याच्या जव्हार, मोखाडा, डहाणू तलासरी व वाडा अशा ग्रामीण भागांमध्ये कुपोषणाबरोबरीने बालमृत्यूचे प्रमाण लक्षणीय आहे. ग्रामीण भागांमध्ये बालविवाहासारख्या अनिष्ट रूढी परंपरा अजूनही कमी झालेल्या नाहीत. पालघर जिल्ह्यात गेल्या पाच वर्षात पाचशेहून अधिक बालविवाह झाल्याचे अलीकडे एका सर्वेक्षण अहवालातून समोर आले होते. कुपोषण, कमी दिवसात जन्मलेले बाळ, कमी वजनाचे बाळ, इतर आजार, अपघात, श्वासोच्छवास कोंडणे अशा विविध कारणांनी ते ६ वर्षांच्या बालकांचा बालमृत्यू होत असल्याचे तज्ज्ञांमार्फत सांगण्यात येते. तर रक्तक्षय, मुदत पूर्व प्रसूती, शारीरिक कमजोरी, हृदयविकार अशा कारणांमुळे माता मृत्यू होत आहेत. पालघर जिल्ह्यात मुदतपूर्व प्रसूतीमुळे बालकांची मृत्यू झाल्याची संख्या जास्त असली तरी कमी वजनाचे बाळ जन्मल्यामुळे मृत्यूचे प्रमाण आहे. पालघर जिल्ह्यामधील माता मृत्यूचे प्रमाण चिंताजनक असल्याचे उपलब्ध आकडेवारीवरून दिसून येत आहे. गेल्या तीन वर्षांमध्ये आरोग्य विभागासह महिला बाल विकास विभाग ग्रामपंचायत तसेच जिल्हा परिषदेतील लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयाने जिल्ह्यात बालमृत्यू कमी करण्यासाठी राबविण्यात आलेले कुपोषण निर्मूलन प्रभावीपणे राबवले जात असल्यामुळे राज्याच्या तुलनेत गेल्या तीन वर्षात पालघर जिल्ह्यातील बालमृत्यूमध्ये घट झालेली आहे. हा आलेख कायम राहणे आवश्यक आहे. चिंतेची बाब म्हणजे किशोरवयीन मातांच्या मुलांमधील कुपोषणाचा धोका किती गंभीर आहे हे भारतातील पौगंडावस्थेतील गर्भधारणा आणि मुलांमधील कमी पोषण यांच्यातील संबंधांवर अभ्यासात स्पष्टपणे दिसून येते. प्रौढ मातांच्या तुलनेत पौगंडावस्थेतील मातांमध्ये कमी वजनाच्या मुलांचा धोका १० टक्क्यांनी जास्त आहे. आजही सुमारे सुमारे ४० टक्के किशोरवयीन मुलींना अशक्तपणाचा त्रास होतो. एक चतुर्थांश किशोरवयीन मुली या शालेय सेवांपासून वंचित आहेत. ज्यात माध्यान्ह भोजन, द्विवार्षिक आरोग्य तपासणी, जंत तपासणी, साप्ताहिक लोह आणि फोलिक ॲसिड पूरक आहार या सेवांचा समावेश आहे. पौगंडावस्थेतील तरुण आणि प्रौढांचे जीवन समजून घेताना पोषण आहार हा अतिशय महत्त्वाचा घटक असल्याचे अभ्यासाच्या निष्कर्षातून समोर आले आहे. पौगंडावस्थेतील मुले आणि तरुण मुली कुपोषणाच्या चक्रात कसे अडकले जातात हे देशभरातील विविध केस स्टडिजवरून लक्षात येते. लवकर विवाह, गरीब सामाजिक-आर्थिक परिस्थिती, योग्य पोषणाचा अभाव आणि शिक्षणाचा अभाव यासह अनेक घटकांचा यात समावेश आहे. पिढ्यान्पिढ्या चालत आलेले कुपोषणाचे चक्र भेदण्यासाठी पौष्टिक आहारात गुंतवणूक होणे किती महत्त्वाचे हे यातून स्पष्ट होते. कारण, याचा परिणाम पुढील अनेक पिढ्यांवर होत असतो. लवकर होणारे विवाह रोखणे, पौगंडावस्थेतील गर्भधारणा टाळणे आणि त्रियांची पौष्टिक स्थिती सुधारणे या मूलभूत गोष्टींचा अवलंब केल्यास कुपोषणाच्या चक्राला ब्रेक लावण्यात बऱ्याच अंशी मदत होऊ शकते. किशोरवयीन प्रजनन रोखणे आणि लैंगिक आरोग्य कार्यक्रम राबवल्यामुळे कुपोषणाची साखळी तोडली जाऊ शकते. यातूनच किशोरवयीन मुलींच्या आरोग्याचे संरक्षणही होऊ शकते.

# वाघ... केवळ शिकारी नव्हे, तर जैवशृंखलेचा श्वास!

भारतीय संस्कृतीत वाघ हे केवळ वन्य प्राणी नाही, तर सामर्थ्य, शौर्य आणि पर्यावरणीय संतुलनाचे प्रतीक मानले गेले आहे. देवी दुर्गेच्या वाहनापासून ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या तोफांवरील कोरीव वाघापर्यंत याचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. याच वाघाच्या संवर्धनासाठी दरवर्षी २९ जुलै रोजी जागतिक व्याघ्र दिन साजरा केला जातो – एक दिवस केवळ प्राण्यांसाठी नाही, तर आपल्याच संवेदना जागवणारा.

वाघ हा अन्नसाखळीतील सर्वोच्च शिकारी असला, तरी त्याचे अस्तित्व म्हणजे संपूर्ण जैवविविधतेचे आरोग्य. एक वाघ सुमारे ५० ते १०० चौ.किमी परिसर व्यापतो आणि त्या अधिवासातील अनेक प्रजाती, झाडे, जलस्रोत यांचे संरक्षणही नकळत घडते. म्हणूनच म्हटले जाते – वाघ वाचला, तर जंगल वाचेल आणि जंगल वाचले, तर माणसाचे आयुष्यही सुरक्षित राहील. एकेकाळी भारतात ४० हजार वाघ होते, परंतु अविचारी शिकारी व जंगलतोडीमुळे १९७२ पर्यंत केवळ १,४०० इतकी संख्या उरली. या घटलेल्या संख्येच्या पार्श्वभूमीवर 'प्रोजेक्ट टायगर' ही ऐतिहासिक मोहीम सुरू झाली आणि आज भारतात पुन्हा ३,१६७ वाघ अस्तित्वात आहेत – जगातील सर्वाधिक!



महाराष्ट्रातील वाघ संवर्धनात जळगाव जिल्ह्याचाही वाटा वाढतो आहे. विशेषतः यावल प्रादेशिक वनविभागात २०११ नंतर पुन्हा वाघ दाखल झाला. मेळघाटातून वाघ वाघदऱ्या, वढोदा रेंजमार्गे स्थलांतर करून यावलच्या जंगलात येतो, हे आता संशोधनातून सिद्ध झाले आहे. २०२४ मध्ये ट्रॅप कॅमेऱ्यात स्पष्टपणे वाघाचे दृश्य नोंदवले गेले. २०२५ मध्ये गौताळा-ऑट्रामघाट परिसरातही अशाच प्रकारच्या वाघाच्या उपस्थितीच्या बातम्या मिळाल्या. यावल विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक समाधान पाटील यांच्या माहितीनुसार सध्या यावल परिसरात दोन वाघ ट्रांझिट अवस्थेत आहेत, तर मुक्ताईनगर भागात 'बनाना टायगर' म्हणून ओळखला जाणारा वाघ अधूनमधून दिसून येतो. त्याचप्रमाणे पाल जंगल सफारी मार्गावर वाघाच्या पावलांचे चिन्हही अलीकडेच आढळले आहेत आणि जंगल सफारी लवकरच सुरु होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत.

या साऱ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर, यावल प्रादेशिक वनविभागात १२ मे २०२४ रोजी बुद्ध पौर्णिमेच्या लख्ख चांदण्यात पार पडलेली वन्यप्राणी गणना ही एक वेगळाच अनुभव देणारी ठरली. यामध्ये चोपडा, वैजापूर, अडावद, देवझिरी, यावल (पूर्व-पश्चिम), आणि रावेर अशा सातही वनक्षेत्रात एकूण ३९ मचानींवर प्राणीगणना झाली. ८० निसर्गप्रेमींनी सहभाग घेतला आणि एकूण ५८४ वन्य प्राण्यांची नोंद झाली. यामध्ये निलगाय, चिंकारा, भेकर, सांबर, चौशिंगा, काळवीट यांसारखे शाकाहारी, तसेच बिबट, लांडगा, कोल्हा, रानमांजर, तरस, अस्वल यांसारखे शिकारी प्राणी दिसून आले. विशेष म्हणजे रावेर वनक्षेत्रात एक वाघ आणि चार बिबटांचे प्रत्यक्ष दर्शन झाले. हे सर्व प्राणी वाघाच्या नैसर्गिक अधिवासात सहअस्तित्व करणारे आहेत, म्हणूनच ही प्रजाती साखळी वाघाच्या अस्तित्वाला पूरक ठरते.

या संपूर्ण उपक्रमाचे यश हे केवळ वनविभागाचे नसून संपूर्ण जिल्ह्याचे आहे. जिल्हा प्रशासनाचे सहकार्य, निसर्गप्रेमींचा उत्साह, आणि श्रीमती निनू सोमराज (म. वनसंरक्षक), जमीर शेख (उपवनसंरक्षक), समाधान पाटील (सहायक वनसंरक्षक), तसेच चोख प्रशासन व मैदानातील वन अधिकारी व कर्मचाऱ्यांचे समन्वयाने हे शक्य झाले.

वाघ वाचवणे म्हणजे केवळ एक प्रजाती वाचवणे नव्हे, तर हवामान, पाणी, माती, जंगल आणि पर्यायाने आपलेच भविष्य सुरक्षित ठेवणे होय. म्हणूनच आपण सर्वांनी जंगलतोड रोखणे, शिकारीविरोधात आवाज उठवणे, पर्यावरण शिक्षण वाढवणे आणि जबाबदार पर्यटनाला प्रोत्साहन देणे या गोष्टींकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

आजच्या दिवशी, जागतिक व्याघ्र दिनाच्या निमित्ताने आपण संकल्प करूया –

"वाघ वाचवा, जंगल वाचवा, जीवन वाचवा!"

- युवराज पाटील
जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव

# खरं मित्रप्रेम त्यागात...

ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी राष्ट्रीय मैत्री दिन देशभरात साजरा केला जातो. भारतात बहुतांश शाळा महाविद्यालये, कार्यालये यांना रविवारी सुट्टी असल्याने हा दिवस आदल्या दिवशी शनिवारी किंवा दुसऱ्या दिवशी सोमवारी साजरा केला जातो. दरवर्षी भारतात उत्साहाने साजरा करण्यात येणाऱ्या 'फ्रेंडशिप डे'ला तसा कोणताही ऐतिहासिक आधार नाही. पेरुग्वेमध्ये सुरु झालेला हा मैत्री दिन आज भारतातील गल्लीपासून दिल्लीपर्यंत पोहोचला आहे. अमेरिकेत १९३५ मध्ये ऑगस्टच्या पहिल्या रविवारी एका व्यक्तीची हत्या करण्यात आली होती. खून झालेल्या व्यक्तीच्या जवळच्या मित्राला ही घटना कळताच त्यानेही निराशेने आत्महत्या केली. मित्रांमधील हे प्रेम पाहून अमेरिकन सरकारने ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी फ्रेंडशिप डे साजरा करण्याचा निर्णय घेतला होता. यानंतर भारतासह इतर देशांमध्ये ऑगस्टच्या पहिल्या रविवारी फ्रेंडशिप डे साजरा केला जाऊ लागला. शालेय आणि महाविद्यालयीन तरुणांमध्ये या दिवसाची विशेष क्रेझ असते. हल्ली सर्वांच्याच हातात स्मार्टफोन आणि त्यात अनलिमिटेड इंटरनेट डाटा आल्याने सोशल मीडियावर या विदेशी दिवसांचे भलतेच पेव फुटले आहे.



मैत्रीचे नाते हे रक्ताचे नाते नसले तरी ते सर्व नात्याच्या पलीकडचे पण अत्यंत जिवाभावाचे असते. जीवनात एकतरी मित्र असावा ज्याच्याशी आपले सुख दुःख व्यक्त करता येईल,आपल्या भाव भावना, मनातील विचार त्याच्यासमोर प्रकट करता करता येतील, कठीण काळात तो आपला आधार बनून आपल्यासोबत उभा राहील. प्रसंगी आपल्याला योग्य सल्ला देईल आणि आपल्याकडून चूक झाल्यास ती परखडपणे आपल्याला सांगेल. आजमितीला स्मार्ट फोनच्या दुनियेत मैत्रीच्या व्याख्या बदलू लागल्या आहेत. फेसबुकवर आणि इंस्टाग्रामवर हजारोंच्या संख्येने मित्र आणि फॉलोअर्स असणे याला मैत्री म्हणावे का ? आपल्यावर कठीण प्रसंग ओढावल्यावर सामाजिक माध्यमांवरील किती मित्र आपल्या मदतीला धावून येतील. मित्रत्वाचे नाते केवळ मनगटावर रिबिनी बांधून, पेनाने नावे लिहून आणि सोशल मीडियावर शुभेच्छा देऊन व्यक्त करता येत नाही. त्यामागे असावी लागते ती त्यागाची भावना. कुठूनतरी परदेशातून आलेले फॅड चालवून एक दिवस आपले मित्रप्रेम सार्वजनिकरित्या प्रकट करण्याऐवजी या देशाच्या मातीत घडून गेलेल्या अपार मित्रप्रेमाच्या आणि त्यासाठी केलेल्या त्यागाच्या कथा आज शाळा महाविद्यालयांतून विद्यार्थी मनावर बिंबवायला हव्यात. सुदामासाठी आपले सारे वैभव लुटवू पाहणारा श्रीकृष्ण, शिवरायांच्या हिंदवी स्वराज्य स्थापनेच्या लढ्यात प्राणाची बाजी लावून लढलेले सवंगडी मावळे, संभाजी महाराजांची शेवटच्या श्वासापर्यंत साथ न सोडणारे मित्र कवि कलश अशी एक ना अनेक उदाहरणे या भारत भूमित घडली आहेत. ज्यांच्या मित्रप्रेमाच्या कथा आजही प्रेरणादायी आहेत. या कथा आणि त्यामागील त्यागाची भावना आजच्या पिढीमध्ये रुजवायला हवी म्हणजे मित्रप्रेम हे एक दिवसापुरते सीमित नसते हे त्यांनाही कळेल.

- जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई

## पत्र मानस

### भविष्यात मते मिळविण्याचा नवा फंडा लोकशाहीला घातक

भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना शिंदे यांच्या सरकारने निवडणुक आचार संहिता लागू होण्या आधीच मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेतून फॉर्म भरलेल्या महिलांना मानधन सुरू करावयाचे असल्याने सरकारने १५०० रुपये देण्याची कार्यवाही करण्यात आली. प्रत्येक महिलेच्या बॅक खात्यात पैसे जमा करण्यात आले.दोन कोटी ५२ लाख महिलांनी सत्ताधारी पक्षांच्या उमेदवारांना मतदान करून महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर बहुमत मिळवुन स्थानापन्न झाले. या लाभार्थी पैकी आताच्या घडीला २६ लाख ३४ हजार लाभार्थी विविध कारणांनी अपात्र निश्चित झाले आहेत. यात १४,२९८ पुरूषांनीही लाभ घेतला आहे.हे एक आश्चर्य म्हटले पाहिजे. यातच २७ कोटीची लयलुट करण्यात आल्याचे समजते. एकंदरीत यात ४ हजार ८०० कोटी रूपयांचे सरकारी जनतेच्याच पैशांचे नुकसान झाले आहे. सार्वभौम सत्तेच्या आधारे मतदारांनी निवडुन दिल्याने यात कोणतेच न्यायालय हस्तक्षेप करणार नाही. खरं तर सरकार व सरकारी यंत्रणा यांच्या संगमताने आताचे विद्यमान सरकार सत्तेवर आले आहे. हा गैरप्रकार भविष्यात उग्ररूप धारण केल्याशिवाय राहाणार नाही.

**- अनंत दत्ताराम दाभोळकर, अंधेरी**

### चॅटजीपीटी वापरकर्त्यांची संख्या दरमहा 50 कोटी!

आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) च्या मदतीने चालणाऱ्या चॅटजीपीटीचा वापर प्रचंड वाढला असून नोव्हेंबर २०२२ मध्ये लाँच झाल्यापासून गेल्या अडीच वर्षात चॅटजीपीटीने जगभरात वेगाने लोकप्रियता मिळवली आहे. चॅटजीपीटी वापरकर्त्यांची संख्या दरमहा ५० कोटीपर्यंत पोहोचली आहे. यूएसएच्या सॅन फ्रान्सिस्को, कॅलिफोर्निया येथे मुख्यालय असलेल्या 'सेन्सर टॉवर' या मार्केट रिसर्च कंपनीच्या सर्व्हेनुसार चॅटजीपीटी हे टूल दररोज १ अब्ज वेळा शोधले जाते, यावरूनच त्याचे महत्व अधोरेखित होते. वर्षभरात चॅटजीपीटीला विचारले गेलेले सर्वाधिक प्रश्न हे सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट २९ टक्के, इतिहास आणि समाज १५ टक्के, एआय आणि मशीन लर्निंग १४ टक्के, अर्थशास्त्र, वित्त आणि कर १३ टक्के, कायदा आणि कायदेशीर प्रश्न ४ टक्के आणि हवामान आणि पर्यावरणाविषयी २ टक्के या संदर्भात होते.आपल्यासारख्या सर्वसामान्यांच्या दृष्टीने महत्वाची बाब म्हणजे चॅटजीपीटी टूल आज लोकांना लेखन, संशोधन, ग्राहक सेवा यासारख्या व इतर अनेक कामांमध्ये मदत करत असले तरी त्यावर संपूर्ण अवलंबून राहणे योग्य ठरणार नाही, कारण चॅटजीपीटीमध्ये अनेक सुरक्षा प्रणालींचा समावेश केला असला तरी आणि ती वापरण्यास सुरक्षित मानली जात असली तरी इतर कोणत्याही ऑनलाइन टूल्सप्रमाणे ते सायबर धोक्यांपासून मुक्त नाही, असे सायबर तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे**

### पान बिडी स्टॉलबाबत कारवाई कधी करणार?

मुंबईतील बेकायदेशीर पान बिडी स्टॉल बाबतीतील एका याचिकेवरील सुनावणी दरम्यान उच्च न्यायालयाने प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून संबंधित खात्याच्या पालिका अधिकाऱ्याच्या थेट चौकशीचे आदेशच दिले गेले आहेत. यावरूनच प्रकरण किती गंभीर आहे याचा अंदाज आपल्याला येतो. पालिका श्रेत्रातील अनधिकृत म्हणजेच आक्रमण केलेल्या जागेवरील बेकायदेशीर केलेले बांधकाम मग ती इमारत असेल किंवा फुटपाथवरील एखाद्या गृहनिर्माण सोसायटीच्या बाहेरील बाजूकडील उभारलेली बेकायदेशीर बांधकाम पान टपरी स्टॉल असेल. मुंबईत जागोजागी अशा छोटया आकाराच्या पान टपऱ्या उभ्या आहेत. यातील फूटपाथवरील काही पान टपऱ्या स्टॉल शाळेच्या हाकेच्या अंतरावर तर काही निवासी इमारतीच्या गेटच्या जवळपास. विशेष म्हणजे या सर्व पान टपऱ्याचे मालक अधिकाधिक अमराठी बांधवच आहेत. माननिय न्यायालयाने फुटपाथ संदर्भात नागरिकांचे म्हणजेच पादचाऱ्यांचे अधिकार याआधीच विविध आदेशा द्वारे पूर्णपणे स्पष्ट केलेले आहे. म्हणूनच तर मुंबईच्या आरोग्याचे हित बघता आणि सामाजिक बांधिलकी पाहता अशा बेकायदेशीर पान टपरी स्टॉलवर लवकरात लवकर कठोर कारवाई करायला हवी,असे वाटते.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

### दुटप्पी नैतिकता आणि राजीनाम्याचं राजकारण...

राजकारणात राजीनामा ही केवळ कायदेशीर नव्हे, तर नैतिक जबाबदारीची खूण असते. आरोप सिद्ध व्हायच्या आधीच, चौकशी होईपर्यंत पद सोडणं ही भूमिका पूर्वी अनेकांनी घेतली. पण आज सत्तेत आल्यानंतर ही नैतिकतेची चौकट बाजूला सारली जातेय. महाविकास आघाडीच्या काळात मंत्री संजय राठोड यांच्यावर संशयास्पद मृत्यूशी संबंधित आरोप झाले, आणि त्यांनी तत्काळ राजीनामा दिला. तेव्हा भाजपने आकाशपाताळ एक केलं होतं – नैतिकतेचा गजर करत. आज मात्र त्याच भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये आरोप झाले की मौन बाळगलं जातं, पाठराखण केली जाते. उदाहणादाखल माणिकराव कोकाटे, राष्ट्रवादी (अजित पवार गट) आमदार आणि मंत्री. विधानभवनात अधिवेशन सुरू असताना मोबाईलवर रमी खेळताना त्यांचा व्हिडिओ व्हायरल झाला. हे केवळ गैरशिस्त नव्हे, तर लोकशाही संस्थेचा अवमान आहे. तरीही ना चौकशी, ना राजीनामा. उलट सौम्य शब्दांत विषय गुंडाळला गेला. भाजप विरोधात असताना नैतिकतेची तलवार उपसते, पण सत्तेत आल्यावर तीच तलवार म्यान करून बसते – ही दुटप्पी भूमिका भाजप नेहमीच बाळगताना दिसते.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

### आता महाराष्ट्रात केवळ एकच माळढोक पक्षी

अलीकडे पर्यावरणाच्या नावाखाली निसर्ग व जल व प्राणी संपत्ती यांची लूट होत आहे महाराष्ट्र सरकारच्या वन विभागाने १२ मे रोजी प्राणी व पक्षांची गणना केली या काळात महाराष्ट्रातील शोलापूर जिल्ह्यातील नान्नज अभयारण्यात एकही माळढोक पक्षी दिसला नाही हि बातमी नुकतीच वाचली मागील वर्षी एक माळढोक आजमितीला महाराष्ट्रात केवळएकच माळढोक आहे टी मादी आहे १० ते २० वर्ष पूर्वी माळढोक पक्षांची संख्या ३० ते ३५ पेक्षा जास्त होती राज्यातील वाढती विकास कामे व गवताळ प्रदेशाची घटती संख्या यामुळे हि संख्या खालावलेली आहे आता संपूर्ण देशात केवळ १४० माळढोक पक्षी आहेत महाराष्ट्रात शोलापूर व अहमदनगर या दोन जिल्ह्यात आहेत हा पक्षी सुमारे १८ किलो वजनाचा असतो त्याची उंची ३ फूट ७ इंच एवढी असू शकते त्याचे आयुष्य १५ ते १७ वर्षे एवढे आहे आता सरकार व विविध प्राणी संघटना यांनी लक्ष घालून या पक्षाला वाचविले पाहिजे

**- शांताराम वाघ पुणे**

### मग खरे आरोपी कोण?

मुंबईत २००६ साली झालेल्या लोकल गाडी मधील साखळी बॉम्बस्फोट घटनेतील १२ आरोपी सबळ पुराव्याअभावी १९ वर्षांनी सुटले व आताही २००८ साली मालेगाव शहरात मशिदीजवळ झालेल्या बॉम्ब स्फोट घटनेतील ७ आरोपी १७ वर्षांनी निर्दोष सुटले आहेत. मग ज्यांनी बॉम्बस्फोट घडवून आणले ते खरे आरोपी कोण आहेत.असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडत आहे.राष्ट्रीय तपास यंत्रणा,दहशतवादी विरोधी पथक न्यायालयात सबळ पुरावा सादर करण्यासाठी कमी पडले आहेत.असेच निष्पन्न होत आहे.हे पोलीस तपास यंत्रणेचे अपयश म्हणावे लागेल. बॉम्बस्फोटात निरपराध नागरिक हकनाक बळी गेले त्यांच्या कुटुंबियांना मग न्याय कसा मिळणार ?

**- नंदकुमार आ पांचाळ, घोडपदेव**

## ज्येष्ठाची फसवणूक, बदलापुरात 8 लाखांचा गंडा

**उल्हासनगर :** शेअर बाजारात अधिकच्या परताव्याचे आमिष दाखवून शेअर खरेदी करण्यास भाग पाडून तब्बल ५ कोटी ७७ लाखांची फसवणूक करण्यात आली आहे. एका ७३ वर्षीय व्यक्तीने याप्रकरणी उल्हासनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत. बदलापुरातही अशाच प्रकारे ८ लाख २३ हजारांचा गंडा घालण्यात आला आहे. उल्हासनगरातील हा आठवडाभरातील तिसरा गुन्हा असून बदलापुरातील दुसरा गुन्हा आहे. ऑनलाईन, व्हाट्सअपद्वारे किंवा विविध माध्यमातून संपर्क करून गुंतवणुकीच्या नावाखाली सर्वसामान्यांना कोट्यावधींचा गंडा घातला जातो आहे. याची अनेक प्रकरणे समोर येत असतानाही यात फसवणुकीचे प्रकार कमी होताना दिसत नाहीत. यात महिलांसह, ज्येष्ठ नागरिकही चोरट्यांच्या जाळ्यात अडकत आहेत. दोनच दिवसांपूर्वी असाच ऑनलाईन फसवणुकीचा प्रकार समोर आलेला असताना आता तब्बल ५ कोटींच्या फसवणुकीचा प्रकार समोर आला आहे.




## म ह त्वा चे

### कर्जत दूध संघाच्या अध्यक्षपदी मंगेश जगताप

**कर्जत :** सहकार महर्षी रावसाहेब उर्फ बाळासाहेब जगताप पाटील सहकारी दूध संघाच्या अध्यक्षपदी मंगेश जगताप यांची तर उपाध्यक्षपदी दादासाहेब खराडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी सर्व नवनिर्वाचित संचालक मंडळ उपस्थित होते. कर्जत दूध संघाच्या संचालक मंडळाची नुकतीच निवडणूक बिनविरोध झाली. त्यानंतर नूतन पदाधिकारी निवडीसाठी संचालक मंडळाची सभा आयोजित करण्यात आली होती. अध्यक्षपदासाठी मंगेश जगताप तर उपाध्यक्षपदासाठी दादासाहेब खराडे यांचे एकमेव अर्ज दाखल झाले. यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर गाडे यांनी या दोघांचीही बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. संचालक काकासाहेब धांडे, शामराव काळे, बाळासाहेब निंबाळकर, अंकुश दळवी, रामजी पाटील, दत्तात्रय पाटील, शंकर देशमुख, दत्तात्रय तनपुरे, दादासाहेब निंबाळकर, शिवाजी काळे, बारकू काळे, शशिकला शेळके व छाया ढगे हे संचालक उपस्थित होते.

### कोपरी पुल प्रवासासाठी खुला

**ठाणे :** ठाण्यातील कोपरी परिसरात नेहमीच वाहतूक कोंडी असते. प्रवासी जवळपास अर्धा अर्धा तास एकाच जागेवर उभे असतात. दरम्यान, आता कोपरीतील वाहतूक कोंडी फुटणार आहे. ठाणे पूर्व सॅटीस २ प्रकल्पाअंतर्गत कोपरी रेल्वे उड्डाणपूल येथे तुळई बसवण्याचे काम पूर्ण झाले आहे. मध्ये रेल्वेवर आठ दिवसांत १४ तासांचा विशेष ब्लॉक घेऊन हे काम पूर्ण करण्यात आले आहे. ब्लॉक असलेल्या कालावधीत मार्गिकेच्या दोन्ही बाजूंना तुळई बसवण्यात आल्या आहेत. याचे उर्वरित काम हे सोमवारपर्यंत पूर्ण होणार आहे. मात्र, हे कामासाठी कोपरी पूल बंद ठेवण्याची गरज नाही.

## तुर्भ्यात एनएमएमटीच्या भरधाव बसने 6 जणांना उडवलं

### चालकाविरोधात गुन्हा दाखल

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबईतील तुर्भे नाका परिसरात एनएमएमटी इलेक्ट्रिक बसने नियंत्रण गमावले आणि पादचाऱ्यांना धडक दिली, यात सहा जण जखमी झाले असून त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार करण्यात आले. सुदैवाने, कोणालाही मोठी इजा झाली नाही. याप्रकरणी तुर्भे पोलिसांत बसचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना गुरुवारी रात्री ९.०० वाजताच्या सुमारास घडली, असे वृत्तसंस्था पीटीआयने दिले आहे.



बसचालक प्रमोद रमेश कनोजिया (वय, ५२) याच्याविरुद्ध कलम २८०, १२४ (अ) आणि भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्याच्या इतर संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती तुर्भे पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक आचासाहेब पाटील यांनी पीटीआयला दिली.

तुर्भे पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक प्रकाश जगताप यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की, बस जास्त वेगाने चालवली जात होती आणि फायझर कंपनी रोड स्ट्रीचजवळ चालकाचे नियंत्रण सुटले आणि हा अपघात घडला. या अपघातात सहा जण किरकोळ जखमी झाले. त्यांच्यावर उपचार करण्यात आले. घटनाग्रस्त बस ही एनएमएमटीच्या तुर्भे डेपोची आहे. वाहन जप्त करण्यात आले आहे आणि फॉरेन्सिक आणि यांत्रिक तपासणी सुरू आहे.

## राज्यातील ज्यु प्रार्थनास्थळांना पर्यटनाचा दर्जा

### इस्त्रायलचे वाणिज्यदूत कोबी शोशानी यांची अलिबागला भेट



प्रतिनिधी
■ अलिबाग

भारत आणि इस्त्रायल यांच्यातील संबंध अधिक दृढ व्हावेत यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने महत्वाचे पाऊल उचलले आहे. राज्यातील ज्युईश प्रार्थनास्थळे आणि वारसा स्थळांना पर्यटन स्थळांचा दर्जा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर इस्त्रायलचे मुंबईतील वाणिज्य दूत कोबी शोशानी यांनी आज अलिबागला भेट दिली.

कोबी शोशानी यांनी आपल्या अलिबाग दौरयात रेवदंडा आणि अलिबाग येथे ज्युईश प्रार्थनास्थळांना (सिनेगॉग) भेट दिली. स्थानिक ज्युईश बांधवांशी चर्चा केली. या प्रार्थनास्थळांचे जतन करा असे आवाहन त्यांनी केले. भारत आणि इस्त्रायलमधील हे सांस्कृतीक नाते अधिक वृद्धींगत करण्याकरिता महाराष्ट्राच्या पर्यटन मंत्रालयासोबत, इस्त्रायलच्या वाणिज्य दूतावासाने "द ज्यू रूट" चे उपक्रम हाती घेण्यात आला आहे., ज्यामध्ये जवळपास १२ स्थळे आहेत आणि जगभरातील पर्यटकांना भारतातील ज्यूंच्या वारसास्थळांना भेट देण्यासाठी आमंत्रित केल्याचे त्यांनी सांगितले.

भारत इस्त्रायल मधील सांस्कृतीक वारसा अधिक वृद्धींगत करण्याचा उभय देशांचा प्रयत्न असून त्यांच अंतर्गत आज मी अलिबाग मधील १८४० मध्ये बांधलेल्या मागेन आबोध आणि रेवदंडा येथील बेथ एल सिनेगॉग या ज्यूईश प्रार्थना स्थळांना भेट देण्यासाठी आलो असल्याचे तूयांनी सांगीतले. यावेळी बेंजामीन वासकर, केरेन चौलकर, एलीस वासकर, बेनी चौलकर शोफेत आवासकर, अब्राहम आवासकर, मोजस कासुकर, जेकब वासकर आदि उपस्थित होते.

## नातवानेच केली आजोबांची हत्या

### म्हसळा शहरातील धक्कादायक घटना

■ म्हसळा

रायगड जिल्ह्यातील म्हसळा शहरात नातवानच आपल्या आजोबांचा धारदार शस्त्रानं खून केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. ही घटना गुरूवारी रात्री घडली. ही घटना म्हसळा शहरातील भरवस्तीत घडल्यानं परिसरात एकच खळबळ उडाली आहे. शौकत परदेशी (वय 70) असं खून झालेल्या आजोबांचं नाव आहे. तर नातू मोहंमद अली परदेशी (वय 26) यानं आजोबांची हत्या केली, असं पोलीस तपासात स्पष्ट झालं आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी मोहंमद अली परदेशी याला अटक केली आहे.

मोहंमद अली परदेशी या तरूणानं गुरूवारी रात्री आपल्या आजोबांची हत्या केली. "गुरूवारी रात्री एक अनोळखी इसम तोंडावर रुमाल बांधून घरात घुसला. यावेळी त्यानं आजोबांवर धारदार शस्त्रानं वार केला. यात आजोबांचा मृत्यू झाला. यानंतर तो घटनास्थळावरून पळून गेला.

## लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांना पालिका मुख्यालयात विनम्र अभिवादन

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती निमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले.




याप्रसंगी प्रशासन विभागाचे उपआयुक्त श्री.भागवत डोईफोडे, अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड, अतिरिक्त शहर अभियंता श्री.अरविंद शिंदे, सहा. आयुक्त श्रीम. स्वरूपा परळीकर व श्रीम. शिल्पा देशपांडे, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## स्वातंत्र्यलढ्यातील चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या हुतात्मा स्मारकाच्या सभागृहाच्या छताची पडझड

### ग्रामपंचायतिकडून दुरुस्तीची मागणी

■ उरण

स्वातंत्र्य संग्रामाच्या लढ्यातील चिरनेर जंगल सत्याग्रहातील आपल्या प्राणाचे बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांच्या नावाने उभारण्यात आलेल्या ऐतिहासिक चिरनेर गावातील हुतात्मा स्मारकाचे आकर्षण असलेल्या सभागृहाच्या छताच्या सिलिंगची पडझड झाली असून, हुतात्मा स्मारकाची शोभा गेली आहे. त्यामुळे



चिरनेर ग्रामस्थांबरोबर स्वातंत्र्य प्रेमी देशभक्तांनी नाराजी व्यक्त केली आहे.

दरम्यान चिरनेर ग्रामपंचायतीचे सरपंच भास्कर मोकल, उपसरपंच अरुण पाटील, माजी उपसरपंच सचिन घबाडी यांच्यासह ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याला या संदर्भात लेखी निवेदन दिले असून, येत्या २५ सप्टेंबर रोजी साजऱ्या होणाऱ्या चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या स्मृतिदिनाच्या आत हुतात्मा स्मारकाच्या छताच्या सिलिंगच्या झालेल्या पडझडीची दुरुस्ती संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याने करावी.

## परिवहन कर्मचाऱ्यांनी पुकारला संप

### अचानक बस सेवा बंद झाल्यामुळे चाकरमान्यांची मोठी गैरसोय

प्रतिनिधी
■ भाईंदर

मीरा-भाईंदर महानगरपालिका परिवहन विभागाचे (MBMTC) कर्मचारी आज अचानक संपावर गेल्याने शहरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः सकाळच्या वेळेस कामावर जाणाऱ्या चाकरमानींची मोठी गैरसोय झाली आहे. मिरारोड रेल्वे स्टेशन परिसरात सकाळपासूनच लांबच लांब रांगा लागल्या असून, बस सेवा बंद



असल्यामुळे नागरिकांना रिक्षा व खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत आहे. यामुळे प्रवास खर्चात मोठी वाढ झाली असून अनेक नागरिक उशिरा कार्यालयात पोहोचले.

संपाबाबत प्रशासनाकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नसून, कर्मचारी संघटनांनी विविध मागण्यांसाठी संप पुकारल्याचे सूत्रांकडून समजते. नागरिकांनी लवकरात लवकर बस सेवा सुरळीत करण्याची मागणी केली आहे.

## 11 लाख रुपयांच्या पॅडेनियम धातूची चोरी; संशयित अटक

■ नवी मुंबई

काम करत असलेल्या कंपनीतून ११ लाख रुपयांचा पॅडेनियम धातू चोरी केल्या प्रकरणी संशयित आरोपीस अटक करण्यात आली आहे. त्याच्या कडून चोरीचा ऐवज जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. हि कारवाई तुर्भे एमआयडीसी पोलिसांनी केली आहे. या कंपनीत डाग दागिने, आभूषण, संगणक, मोबाईल अशा इलेक्ट्रॉनिक वस्तूत वापर करण्यात येणारा पॅडेनियम हा मौल्यवान धातू वापरला जातो.

## आ. प्रशांत ठाकूरांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेलमध्ये आमदार चषक भव्य बुद्धिबळ व कॅरम स्पर्धा

■ पनवेल

कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून 'जाणीव एक सामाजिक संस्था' आणि 'सखी महिला मंडळ' यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक ०३ ऑगस्ट रोजी सकाळी ०९ वाजता पनवेलमध्ये 'आमदार चषक भव्य बुद्धिबळ व कॅरम स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे.

शहरातील आगरी समाज सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेचे उदघाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. या स्पर्धेचा क्रीडारसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जाणीव एक सामाजिक संस्थेचे संस्थापक व भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, सखी महिला मंडळाचे संस्थापक आणि पनवेल शहर भाजपचे उपाध्यक्ष प्रीतम म्हात्रे यांनी केले आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**2nd Call RFx (E-TENDER) NOTICE**

MSETCL invites online bids from reputed and registered contractors of appropriate class with MSETCL. Please visit Mahatransco website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| Rfx (Tender) No. | Name of work | Estimated Cost in Rs. | EMD (Rs.) | Tender fee incl. GST (Rs.) |
|---|---|---|---|---|
| 7000037197 | 2nd Call of Rate contract for the work of Chemical Cleaning of dust/bird shit contaminated insulator strings by using High Voltage Insulator Cleaner & Protector on 500kV Chandrapur-Padghe HVDC line and 33kV Anjur Electrode Line under the jurisdiction of Padghe, Junnar, Babhaleshwar, Ch. Sambhajinagar & Jintur sub-divisions for the FY 2025-26. | 1,50,00,000/- | 1,50,000/- | 5900/- |

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of download of RFx (e tender) documents | From - 02.08.2025 from 0000 hrs to 13.08.2025 up to 10:00 hrs. |
| 2 | Date of submission of RFx (e tender) | 13.08.2025 up to 00:00 hrs. |
| 3 | Date of technical bid opening | 13.08.2025 up to 11:00 hrs. (If possible) |
| 4 | Date of commercial bid opening | 13.08.2025 up to 13:00 hrs. (If possible) |

**Contact Person:** The Executive Engineer (ADM), HVDC RS (O&M) Circle, Padgha.
Mob. No: 9011021483
For further details visit our website: **https://srmetender.mahatransco.in**

Sd/-
Superintending Engineer
HVDC RS O&M Circle, Padghe

## पत्राचा चुकीचा अर्थ लावून बदनामी; बदलापुरातील रूग्णालयाचा दावा

■ बदलापूर

एका अपघातग्रस्त व्यक्तीच्या शस्त्रक्रियेदरम्यान झालेल्या मृत्यूप्रकरणी बदलापुरातील सह्याद्री रूग्णालयावर आरोप होत असतानाच, राज्य आरोग्य विभागाच्या सह संचालकांच्या पत्राचा चुकीचा अर्थ काढून रूग्णालयाची बदनामी केली जात असल्याचा दावा रूग्णालय प्रशासनाने केला आहे. रूग्णाच्या शस्त्रक्रियेवेळी आम्ही योग्य काळजी घेऊनच प्रक्रिया केली. याप्रकरणी अहवालात जे असेल ते आम्ही मान्य करू असेही या रूग्णालयाचे प्रमुख डॉ. योगेश मिंढे यांनी सांगितले आहे. तर याप्रकरणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार कारवाई केली जाईल, असे जिल्हा शल्य चिकित्सक कैलास पवार यांनी सांगितले आहे. याप्रकरणी आरोग्य सेवा संचालनालयाने नवे पत्र जारी




करून खुलासा केला आहे.

२८ नोव्हेंबर २०२४ रोजी बदलापुरात एक ३४ वर्षीय तरूणाचा अपघात झाला. त्यानंतर त्या तरूणाला सह्याद्री रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. यावेळी रूग्णालय प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे रूग्णाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईक केला. तर निर्भया सामाजिक संघटनेच्या अध्यक्षा संगिता चेंदवणकर आणि दयावान संघटनेचे अविनाश सोनावणे यांनी याची तक्रार आरोग्य संचालकांकडे तक्रार केली होती.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-Tender Notice.**
**Dated 02.08.2025**

Tender is invited from reputed & registered contractors for following works.

| Sr. No. | Tenders published by Panvel Urban Division | Sale Period |
|---|---|---|
| 1 | EE/PNL-U/TECH/PC0/T-01/2025-2026, Rs77.0 lakhs | 28.07.2025 to 7.08.2025 |
| 2 | EE/PNL-U/Load Unload/T-02/2025-2026, Rs.10.0 lakhs | |

For more details and ammendments, please visit web site: https://works.mahadiscom.in/eTender/etender

PRO NO: 219
email date:01.08.2025

Executive Engineer(O&M)
Panvel Urban Division, MSEDCL

बृहन्मुंबई महानगरपालिका

के.ई.एम. रुग्णालय, परेल, मुंबई ४०००१२
ई-निविदा सूचना
क्र. केईएमएच/२४९२/एईएमई/ दिनांकीत : ०१.०८.२०२५

ही ई-निविदा सूचना आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महापालिका आयुक्त खालील कामासाठी "नग दर तत्वावर ई-निविदा मागवित आहेत:

| अनु. क्र. | कामाचे नाव | ईसारा रक्कम ठेव – रु | बोली सुरु दिनांक आणि वेळ | बोली समाप्ती दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये विविध ठिकाणी कुलिंग सिस्टीमकरिता ड्रेन सिस्टीमची तरतूद आणि बसविणे. निविदा आयडी_२०२५_एमसीजीएम_१२०६५४३_१ | २००००/- @ १% | ०२.०८.२०२५ (१७:०० वा.) | ०९.०८.२०२५ (१७:०० वा.) |
| २ | के.ई.एम. हॉस्पिटल गायनॅक विंगजवळील आर्टसेंटर येथे करायची विविध कामे निविदा आयडी_२०२५_एमसीजीएम_१२०६५४८_१ | २००००/- @ १% | ०२.०८.२०२५ (१७:०० वा.) | ०९.०८.२०२५ (१७:०० वा.) |
| ३ | के.ई.एम. हॉस्पिटल येथील मेन बॉईझ हॉस्टेल बिल्डिंग मीटर सर्विस कॅबीनच्या सुधारणेसह अन्य संबधित कामे. निविदा आयडी_२०२५_एमसीजीएम_१२०६५४१_१ | २००००/- @ १% | ०२.०८.२०२५ (१७:०० वा.) | ०९.०८.२०२५ (१७:०० वा.) |
| ४ | पात्रता निकष (लिफाफा 'ए') | ११.०८.२०२५ | 0 | १७:३० वाजता |
| ५ | तांत्रिक बोली (लिफाफा 'बी') | ११.०८.२०२५ | | १७:४५ वाजता |
| ६ | वाणिज्य बोली (लिफाफा 'सी') | नियोजनानुसार | | |

निविदेच्या अधिक माहितीसाठी इच्छुक निविदाकाररांनी (http:mahatender.gov.in) ला भेट द्या. सदर निविदा सूचनेच्या संदर्भात जर कोणतेही शुद्धिपत्रक जारी केले असल्यास ते केवळ महाटेंडर पोर्टल (http:mahatender.gov.in) वरच प्रसिद्ध केले जाईल. शुद्धिपत्रक स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध केले जाणार नाही.
निविदा कागदपत्रे टपालाद्वारे वितरीत किंवा स्विकारली जाणार नाहीत.

पीआरओ/११८५/जाही/२०२५-२६

सही/-
अधिष्ठाता (के.ई.एम. रुग्णालय)

जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे डासांचे फावते.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

The Executive Engineer, M.S.E.D.C.L., Ground Floor, Tejshree Building, Karnik Road, Kalyan West invites e-Tenders from Registered Contractors / Agencies for the following work.

| S. N. | Tender No. | Particulars | Estt. Cost Rs. | EMD Rs. | Tender Fee with 18% GST |
|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/KLN(W)/PMHT/T-03/2025-26 | Tender for Preventive Maintenance of HT overhead lines and underground cables in Kalyan West Dn of Kalyan Circle- I , Kalyan Zone | 30.00 Lakhs | 30000/- | 2500+450 i.e. Rs.2950/- |
| 2 | EE/KLN(W)/PMLT/T-04/2025-26 | Tender for Preventive Maintenance of LT overhead lines and underground cables in Kalyan West Dn of Kalyan Circle- I , Kalyan Zone | 30.00 Lakhs | 30000/- | 2500+450 i.e. Rs.2950/- |

Bid documents will be available on website from Date 02.08.2025 to 12.08.2025.
Last date for submission is on Date 12.08.2025 up to 15.00 Hrs.
Pre-bid Meeting Date: 07.08.2025 at 11.00 Hrs.
Probable date of opening of E-tender Technical Bid: 12.08.2025 at 16.00 Hrs.
Probable date of Opening of Commercial Bid: 14.08.2025 at 11.00 Hrs.
If the same day happens to be holiday, or any other reason, it will be opened on very next working day.
No hard copy of the Tender Document will be issued by this office.
The undersigned reserves the right to reject any or all tenders received without giving any reason thereof. For more details log on to MSEDCL official website http://works.mahadiscom.in/eTender/etender
Or contact to undersigned on 0251-2329496 (Extn 501, 502, and 508)/8879626333 Or E.mail – eeklnu@gmail.com

Executive Engineer, Kalyan West Division

## जलपूजनानंतर जायकवाडीच्या 18 दरवाजांमधून विसर्ग

**संभाजीनगर :** जायकवाडी धरणाचे १८ दरवाजे अर्धा फूट उचलून गोदावरी पात्रात गुरुवारी पाणी सोडण्यात आले. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते जलपूजन करण्यात आले. येत्या काळात समुद्रात वाहून जाणारे पाणी तुटीच्या गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी प्रयत्न करू, असे आश्वासन या वेळी विखे पाटील यांनी दिले. गोदावरी खोऱ्यात ६५ अब्ज घनफूट पाणी वळवून आणण्यासाठी प्रयत्न करू. महाराष्ट्र दुष्काळमुक्त झाला पाहिजे, ही मुख्यमंत्र्यांची भूमिका आहे. त्यांच्या भूमिकेला साथ देण्यासाठी सगळ्यांचे प्रयत्न आवश्यक आहेत, असे विखे म्हणाले. या कार्यक्रमास आमदार रमेश बोरनारे, विलास भुमरे, हिकमत उडान, विठ्ठलराव लंघे, विजयसिंह पंडित, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जलसंपदा विभागाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार, अधीक्षक अभियंता प्रशांत संत, अधीक्षक अभियंता समाधान सब्बीनवार यांची उपस्थिती होती. गोदावरीतील पाण्याची तूट भरून काढतानाच १२ मेगावॅट जलविद्युत प्रकल्प, तरंगत्या सौर पटलाच्या आधारे ऊर्जा निर्मितीचे प्रकल्प व्हावेत यासाठी चालना देत असल्याचेही विखे यांनी सांगितले.



### म ह त्वा चे

## जिममध्ये व्यायाम करताना हार्ट अटॅकने तरुणाचा मृत्यू

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवडमध्ये व्यायाम करत असताना तरुणाला भोवळ आली आणि तो खाली पडला. जागीच या तरुणाचा मृत्यू झाला. त्याला तात्काळ रुग्णालयात नेण्यात आले. पण डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्याला मृत घोषीत केले. या तरुणाचा मृत्यू हार्ट अटॅकने झाला असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. या घटनेमुळे पिंपरी-चिंचवडमध्ये खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पिंपरी- चिंचवडमध्ये जिममध्ये व्यायाम करताना ३७ वर्षीय तरुणाचा हार्ट अटॅकने मृत्यू झाला. मिलिंद कुलकर्णी असं मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याने ६ महिन्यांपूर्वी जिम ज्वाइन केली होते. अधून-मधून तो जिमला जायचा. आज सकाळी नेहमीप्रमाणे तो जिमध्ये व्यायाम करण्यासाठी गेला अन् भयंकर घडलं. त्याचा जागीच मृत्यू झाला. व्यायाम करून झाल्यानंतर मिलिंदने खाली बसल्यानंतर पाणी प्यायले. अन काही सेकंदात अचानक भोवळ येऊन तो खाली पडला.

## अभियंत्याची 46 लाखांची फसवणूक

**पिंपरी :** जास्त परताव्याच्या आमिषाने ऑनलाइन पद्धतीने पैसे गुंतवणूक केलेल्या संगणक अभियंत्याची ४६ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचा प्रकार जुनी सांगवीत उघडकीस आला. याप्रकरणी ५४ वर्षीय अभियंत्याने सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीला एक अॅप डाऊनलोड करण्यास सांगितले. अॅपच्या माध्यमातून गुंतवणुकीबाबत सविस्तर माहिती दिली. समूहातील लोकांना गुंतवणुकीवर जास्त परतावा मिळत असल्याची माहिती दिली. फिर्यादीचा विश्वास संपादन केला. त्यामुळे फिर्यादीने ३१ लाख ८० हजार रुपये इतकी रक्कम गुंतवली. तसेच आणखी एक अॅप डाऊनलोड केले. अॅपच्या माध्यमातून फिर्यादीला १७ लाख ८० हजार रुपये इतकी रक्कम गुंतवण्यास भाग पाडले. पैसे परत न देता एकूण ४६ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केली. सांगवी पोलीस तपास करित आहेत.

## अकोल्यात स्त्री रुग्णालयातील भ्रष्टाचार उघड

**अकोला :** अकोल्याच्या जिल्हा स्त्री रुग्णालयातील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नवजात शिशु अतिदक्षता विभागातील 31 पदांच्या भरतीसाठीची निविदा प्रक्रिया भ्रष्ट मार्गाने पार पडल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तरंगतुषार वारे, जिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. जयंत पाटील आणि प्रशासकीय अधिकारी ए. एन. डांबरे यांना निलंबित करण्यात आले आहे. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या आदेशावरून ही कारवाई करण्यात आली असून, तिघांवर विभागीय चौकशीचा बडगा उगारण्यात येणार आहे. विशेष म्हणजे गेल्या सहा महिन्यांपासून अकोला जिल्हा स्त्री रूग्णालय हे चांगल्या कामाममूळे सातत्याने अव्वल असलेले रूग्णालय आहे.
सदर प्रक्रिया 2024-25 या आर्थिक वर्षात पार पडली.

# दौंडच्या यवतमध्ये 2 समाजांमध्ये वाद अन् तणाव

### आक्षेपार्ह पोस्टनंतर दगडफेक, जाळपोळ; पोलिसांनी फोडल्या अश्रूधुराच्या नळकांड्या

प्रतिनिधी
■ पुणे

पुण्याच्या दौंड तालुक्यातील यवत येथे दोन गटांत जातीय तणाव निर्माण झाला आहे. व्हॉट्सअॅपवरील एका आक्षेपार्ह पोस्टमुळे हा वाद भडकला. त्यात दोन्ही गटांनी एकमेकांवर दगडफेक केली. त्यानंतर पोलिसांनी वेळीच घटनास्थळी धाव घेऊन स्थितीवर नियंत्रण मिळवले. सध्या या ठिकाणी तणावपूर्ण शांतता आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडून या घटनेची माहिती घेतली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही थेट घटनास्थळी स्थितीचा आढावा घेतला.

यासंबंधीच्या माहितीनुसार, दौंड तालुक्यातील यवत गावातील एका समुदायाच्या तरुणाने शुक्रवारी सकाळी सोशल मीडियावर एक आक्षेपार्ह पोस्ट केली. या पोस्टची माहिती मिळताच गावात तणाव निर्माण झाला. त्यानंतर दुपारी 12 च्या सुमारास यवतचा आठवडी बाजार बंद करण्यात आला. यावेळी एका गटाच्या लोकांनी काही दुचाकी पेटवून दिल्या. या घटनेमुळे गावात तणावपूर्ण स्थिती उद्भवली. यवतचे पोलिस निरीक्षक नारायण देशमुख यांनी सांगितले की, आक्षेपार्ह तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याची चौकशी सुरू आहे. सध्याचा तणाव पाहता गावात मोठा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.



पोलिसांच्या माहितीनुसार, आक्षेपार्ह पोस्ट करणारा तरुण यवतच्या सहकार नगर भागात राहतो. पोस्टनंतर संतप्त जमावाने त्याच्या घराची तोडफोड केली. यावेळी काही लोकांनी एका धार्मिक स्थळावर दगडफेकही केली. यामुळे तणाव वाढला. पण पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला. या घटनेचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झालेत.

उल्लेखनीय बाब म्हणजे गत शनिवारी 26 जुलै रोजी यवतच्या नीळकंठेश्वर मंदिरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचा कथित अवमान झाला होता. या घटनेमुळे निर्माण झालेला तणाव काहीसा निवळला होता. पण त्यानंतर लगेचच ही घटना घडल्यामुळे येथील तणावात मोठी वाढ झाली आहे. या घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलिस अधीक्षक (ग्रामीण) संदीप गिल यांनी यवतच्या दिशेने धाव घेतली.

# कोकण रेल्वेच्या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे ओरोस स्थानकावर आंदोलन

### अधिकाऱ्यांनी आश्वासन दिल्यावर आंदोलन स्थगित

प्रतिनिधी
■ ओरोस

कोकण रेल्वे प्रशासनाकडून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दहा रेल्वे स्थानकांच्या समस्यांकडे सतत दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत, कोकण रेल्वे प्रवासी समन्वय व संघर्ष समिती, सिंधुदुर्ग यांच्या वतीने शुक्रवारी ओरोस सिंधुदुर्ग रेल्वे स्थानकाच्या आवारात धरणे आंदोलन करण्यात आले. वारंवार निवेदने देऊनही कोणतीही दखल घेतली जात नसल्याने संतप्त झालेल्या प्रवाशांनी हे पाऊल उचलले.

या आंदोलनात कोकण रेल्वेच्या गाड्यांना अपुरे थांबे देणे, स्थानिक प्रवाशांना दुय्यम वागणूक, अपुरी आरक्षण सुविधा, वाढते दर आणि स्थानिक मागण्यांकडे सातत्याने होणारे दुर्लक्ष यांसारख्या प्रमुख मुद्द्यांवर भर देण्यात आला. संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी गुरुवारी कोकण रेल्वेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली होती, मात्र त्या बैठकीत कोणताही समाधानकारक तोडगा न निघाल्याने हे आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला.



यावेळी समितीचे अध्यक्ष प्रकाश पावसकर यांनी सांगितले की, "ही लढाई कोणत्याही पक्षाची नाही, तर ती आमच्या हक्काची आहे. जर आज आम्ही आवाज उठवला नाही, तर उद्या तो पूर्णपणे दडपला जाईल. आम्ही कोणतीही सवलत मागत नसून, आमच्या अधिकारांची मागणी करत आहोत."



*पुणे- दोन दिवसांपूर्वीच पुण्याच्या चंदननगर येथील एका मुस्लिम कुटुंबाला फार दुर्दैवी प्रसंगाला सामोरे जावे लागले होते. बजरंग दलाच्या काही स्थानिक कार्यकर्त्यांनी हे मुस्लिम कुटुंब बांगलादेशी असल्याची आवई उठवली होती. तसंच त्यांच्या घरावर पन्नास - साठ कार्यकर्त्यांचा जमाव चालून आला होता. त्यामुळे हे कुटुंब दहशतीत होतं. पण आज भारतीय सैन्यदलातील अधिकाऱ्यांनी या कुटुंबीयांची सदिच्छा भेट घेतली आणि त्यांच्या पाठीशी सैन्याची ताकद असल्याचे सांगून त्यांना आश्वस्त केले. तुमच्या दोन पिढ्यांनी सैन्यामार्फत देशाची सेवा केलीय, तुम्ही या देशाचे अभिन्न अंग आहात, असं सांगून सैन्य अधिकाऱ्यांनी या कुटुंबाला पूर्ण पाठिंबा दिला.*


# रत्नागिरीत दुचाकीचा भीषण अपघात

### दुचाकीस्वराचा जागीच मृत्यू, तर एक गंभीर जखमी

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

रत्नागिरी जिल्ह्यात भीषण अपघाताची घटना घडली आहे. गोव्याकडून मुंबईच्या दिशेने वेगात जाणाऱ्या दुचाकीचा जगबुडी नदीच्या पुलावर भीषण अपघात झाला आहे. वाहनावरील नियंत्रण सुटल्याने गाडी पुलाच्या कठड्याला जोरदार आपटली. या अपघातात दुचाकीस्वार जागीच मृत्यू झाला आहे. अपघात इतका गंभीर होता की अॅक्टिवा गाडीचे पुढचे चाक पूर्णपणे वेगळे होऊन काही अंतरावर जाऊन पडले.

या अपघातात दुचाकीवरील एक व्यक्ती जागीच ठार झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. जखमीला जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.



मुंबई-नाशिक महामार्गावरील खड्ड्यांचा कहर अजूनही थांबलेला नाही. भिवंडी तालुक्यातील चिंचवली फाटा परिसरात एक विचित्र अपघात घडला. वाडा येथून उडिसाकडे जात असलेल्या भंगाराने भरलेल्या ट्रकने मुंबई नाशिक महामार्गावरील पडलेल्या खड्ड्यांमध्ये आदळून आपला ताळतंत्र गमावला आणि ट्रकचा एक भाग रस्त्यावरच कोसळला, तर दुसरा भाग काही अंतरावर जाऊन थांबला. या दुर्घटनेत ट्रकचे थेट दोन तुकडे झाले आहेत. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. अपघातानंतर महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. अपघातग्रस्त ट्रक हटवल्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली.

# समृद्धी महामार्गावर ट्रकमधून अडीच कोटीच्या औषधाची चोरी

■ वाशिम

समृद्धी महामार्गावर भिवंडी इथून कोलकत्ताकडं जाणाऱ्या एका ट्रकमधून 2 कोटी 43 लाख रुपयांच्या औषधी चोरीची घटना 23 जुलैला घडली. याप्रकरणी 31 जुलैला कारंजा ग्रामीण पोलिसात तीन अज्ञात चोरट्यांविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणाचा शोध घेण्यासाठी 25 अधिकाऱ्यांची पाच पथकं तैनात करण्यात आली आहेत.

एमएच 04 जेके 7054 क्रमांकाचा कार्गो ट्रक 4 कोटी 58 लाख रुपये किमतीच्या व्हॅक्सिन भिवंडी इथून समृद्धी महामार्गानं नागपूर-रायपूर मार्गे कोलकाता इथं घेऊन जात होता. 23 जुलै रोजी सायंकाळी 7 ते 8 वाजताच्या दरम्यान डोणगाव पेट्रोल पंप ते कारंजा हद्दीतील पेट्रोल पंपादरम्यान या ट्रकमधील 2 कोटी 43 लाख 87 हजार 684 रुपये किमतीची व्हॅक्सिन लंपास झाल्याचे चालकाच्या निर्दशनास आहे. त्यामुळे त्यानं तत्काळ 112 या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधून पोलिसांना घटनेची माहिती दिली.



# पंढरीत मनसेच्या वतीने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांना अभिवादन

प्रतिनिधी
■ पंढरपूर

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी पंढरपूर येथील मनसे कार्यालयात संयुक्तरित्या साजरी करण्यात आली. याप्रसंगी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन मनसे नेते दिलीप धोत्रे, आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते करून मनसेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी आमदार अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या वतीने करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मनसे तालुकाध्यक्ष शशिकांत पाटील, अनिल बागल, संजय बंदपट्टे, संतोष कांबळे, दत्ता भोसले, एडवोकेट पराग जागीरदार, पत्रकार अभिराज उबाळे, वीरेंद्र उत्पात यांच्यासह मनसेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना मनसे नेते दिलीप बापू धोत्रे म्हणाले की लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लोकमन घडविण्यासाठी शाहीरीच्या माध्यमातून दिलेले योगदान अमूल्य आहे. तसेच त्यांनी वंचित आणि विस्थापितांच्या वेदना साहित्याच्या माध्यमातून मांडल्या. अशा थोर लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. तसेच लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या कार्याला उजाळा देताना सांगितले की अखिल भारताचे पहिले नेते होते. झुंजार पत्रकार. महात्मा फुले यांनी सुरू केलेला शिवजयंतीचा सोहळा देशभर पोचवणारे. सार्वजनिक गणेशोत्सवाचे जनक. विचारवंत. खऱ्या अर्थाने लोकमान्य!ठरल्याचे उद्गार मनसेनेचे दिलीप धोत्रे यांनी काढले.



# बनावट नोटा तयार करणाऱ्या कारखान्यावर पोलिसांचा छापा


### सात जणांना अटक; मुख्य सूत्रधार प्रसार

■ अहिल्यानगर

बनावट नोटा तयार करणारा छत्रपती संभाजीनगर शहराजवळील कारखाना व या बनावट नोटा बाजारात वितरित करणारे रॅकेट अहिल्यानगर तालुका पोलिसांनी उघडकीस आणले आहे. एकूण ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. मात्र मुख्य सूत्रधार फरार झाला. पोलिसांनी ५९ लाख ५० हजार रुपये रुपयांच्या ५०० दराच्या बनावटांसह २ कोटी १६ लाख रुपयाच्या बनावट नोटा तयार तयार होतील, असा कागद, आधुनिक छपाई यंत्र असा एकूण ८८ लाख २० हजार ६०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी आज, शुक्रवारी या कारवाईची माहिती दिली. यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, तपासी अधिकारी नगर तालुका पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक प्रल्हाद गीते आदी यावेळी उपस्थित होते. निखिल शिवाजी गांगर्डे , सोमनाथ माणिक शिंदे, प्रदीप संजय कापरे, मंगेश पंढरी शिरसाठ, विनोद दामोदर अरबट, आकाश बनसोडे व अनिल सुधाकर पवार (वय ३६, मुकुंदनगर, छत्रपती संभाजीनगर) या ७ जणांना अटक करण्यात आली आहे तर मुख्य सूत्रधार अंबादास रामभाऊ ससाने हा फरार आहे.






# दुचाकीला धडक देवून कार चालकासह तिघांचं जंगलात पलायन

प्रतिनिधी
■ सावंतवाडी

सावंतवाडी येथील इन्सुली घाटात दुचाकीला धडक देवून कार चालकासह तिघे जंगलात पळून गेल्याचा प्रकार घडला आहे. हा अपघात आज सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडला. मंगेश सरदेसाई (रा. माडखोल) असे त्याचे नाव आहे. या अपघातात त्याला गंभीर दुखापत झाली असून अधिक उपचारासाठी त्याला गोवा-बांबुळीत हलविण्यात आले आहे. दरम्यान या प्रकरणातील इर्टीका कार चालविणाऱ्या दानिश सिद्दीकी (मुळ रा. मध्यप्रदेश, सध्या रा. गोवा) या संशयिताचा शोध पोलिस घेत आहेत. विशेष म्हणजे संबधित चालकाने ती गाडी आपल्या मालकाला न सांगता आणल्याचे निष्पन्न झाले आहे.





याबाबत अधिक माहिती अशी की, इन्सुली घाटीत सात जांभळी देवस्थान परिसरात काही अंतर पुढे हा अपघात घडला. यातील इर्टीका घेवून संबंधित सिद्दीकी याच्यासह अन्य दोघे गोव्यातून सावंतवाडीच्या दिशेने येत होते तर सरदेसाई हा दुचाकीने गोवा येथे कामाला जात होता.

# रत्नागिरीच्या कार्तिकीची 'नासा' बालवैज्ञानिकसाठी निवड

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

मराठा मंदिर या संस्थेच्या रत्नागिरी,पाली येथील न्यू इंग्लिश स्कूलची इयत्ता आठवीत शिक्षण घेत असलेली विद्यार्थिनी बालवैज्ञानिक कुमारी कार्तिकी सदानंद सागवेकर हिची अमेरिकेतील " नासा " साठी बालवैज्ञानिक म्हणून निवड करण्यात आली.यापूर्वी देखील इयत्ता सातवीत असताना नासा _ इस्रो यांच्या कसोटी परीक्षेत ती उत्तीर्ण होऊन तिला सात दिवस बेंगलोर येथील प्रशिक्षणासाठी सहभागी झालेली होती.



आता कार्तिकीला अमेरिकेतील ' नासा ' संस्थेच्यावतीने बालवैज्ञानिक म्हणून अमेरिकेत दि.३० जुलै ते ११ ऑगस्ट २०२५ या कालावधीत वैज्ञानिक प्रशिक्षण दिले जाणार आहे.विशेष म्हणजे या प्रशिक्षणासाठी रत्नागिरी जिल्ह्यातून एकूण २२ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे.याचा आम्हा कोकणवासियांना नक्कीच अभिमान वाटतो.परंतु जिल्ह्यात या विद्यार्थ्यांनी अभिमानास्पद यश प्राप्त करून देखील कुणी दखल घेत नाही याबद्दल विद्यार्थ्यांच्या पालकांनी नाराजी व्यक्त केली.भविष्यात हे विद्यार्थी भारत देशाचे शिल्पकार बनतील तेव्हा आम्हाला नक्कीच अभिमान वाटेल! कार्तिकीला वडिलांचा आसरा नाही.तिच्या कुटुंबाची आर्थिक बाजू कमकुवत असूनही तिच्या शालेय शिक्षणाला तिच्या माऊलीने प्रोत्साहन दिले.

# कालमर्यादा निश्चित करुन जागतिक पातळीवरचे संस्कृत विद्यापीठ उभारु - मुख्यमंत्री फडणवीस

### डॉ. हेडगेवार अंतरराष्ट्रीय गुरुकुल व अंतरराष्ट्रीय शैक्षणिक भवनचे लोकार्पण

प्रतिनिधी
■ नागपूर

जगातील अनेक जुन्या संस्कृती कालागणिक व्यपगत झाल्या, नामशेष झाल्या. परंतु, भारतीय संस्कृतीला सनातन स्वरुपात टिकवून राहता आले. भारतीय संस्कृतीला टिकवून ठेवण्याचे मोलाचे कार्य संस्कृत भाषेच्या माध्यमातून शक्य झाले. स्थापत्य, आयुर्वेद, खगोल, गणित, रसायन आदी ज्ञानशाखेतील ज्ञानभंडार संस्कृत भाषेमध्ये असून त्याला समाजापुढे नेण्यासाठी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय मोलाची भूमिका बजावेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



आज वारंगा येथे परमपूज्य डॉ. केशव बळीराम हेडगेवार अंतरराष्ट्रीय गुरुकुल व अंतरराष्ट्रीय शैक्षणिक भवनचे लोकार्पण व विद्यार्थी भवनचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले, यावेळी ते बोलत होते. यावेळी सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, वित्त राज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल, कुलगुरु हरेराम त्रिपाठी, संस्थापक कुलगुरू डॉ. पंकज चांदे व अन्य मान्यवर उपस्थित होते.

संस्कृत भाषेचे विद्यापीठ साकारण्यासाठी डॉ. श्रीकांत जिचकार व माजी संस्थापक कुलगुरु डॉ. पंकज चांदे यांनी दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणात केला. कविकुलगुरु कालिदास यांच्या नावाने हे विद्यापीठ असल्याने ते रामटेक येथे व्हावे, अशी सुरुवातीला संकल्पना होती. तथापि, संस्कृत भाषेच्या या ज्ञानपिठाला वैश्विक स्तरावर पोहचणे सुलभ व्हावे, यासाठी आपण रामटेक तालुक्यातील व नागपूरपासून जवळ असलेल्या शैक्षणिक संकुल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वारंगा येथे हे संपूर्ण ज्ञानसंकुल विकसित करण्याचा निर्णय घेतला.

**PUBLIC NOTICE**

Public Notice is hereby given that **Shebaz Sharafat Patel** (Died on 03/05/2021) son of **Sajeeda Sharafat Patel**, currently living at Room No. C/8, Motilal Society, Amir Baug no. 2, P. L. Lokhande Marg, Tilak Nagar, Mumbai - 400089, Maharashtra. I Sajeeda Patel have since applied for his **Death Certificate** at Tehsildar Office, Kurla - Mulund, Mumbai.
I hereby legally invite claims from any / all having any objections / claims **within 15 days** from the date of publication of this notice with supporting documents. If not, thereafter all objections / claims will be considered null & void.
Date: **2 August 2025, Saturday**
Sd/-
**Mr. Sajeeda Sharafat Patel**
Call - **9082632642**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना माझ्या अशिल **नाटीवीढाढे फ्रन्सिस ट्रक्सो** ह्यांच्या कडुन कळविण्यात येते की गाव मौजे-विरार, विरार (प), ता वसई, जि पालघर, येथील **सर्व्हे नं. २८, हिस्सा नं.१६,** ह्या जमिन मिळकतीवर बांधण्यात आलेली इमारत **"अमेय अपार्टमेंट", "अमेय अपार्टमेंट कॉ. ऑप. हौ. सोसायटी लि",** जिवदानी मंदिर रोड, माधवी थेअटर जवळ, विरार (पू), ता-वसई, जि-पालघर-४०१३०५, ह्या बिल्डिंग मधील रूम नं. ३०२, तिसरा मजला, क्षेत्र ३४२ चौ फुट, बिल्टिअप हा फ्लॅट दिनांक- २१/०९/१९९८ रोजी रजिस्टर दस्त नं वसई-२-४२४५-१९९८ च्या नुसार फ्रन्सिस लुईस ट्रक्सो ह्यांनी **मे. साईबा कन्स्ट्रक्शन कं.** ह्यांच्याकडून कायमचा विकत घेतला असून **फ्रन्सिस लुईस ट्रक्सो** हे सदर फ्लॅटचे मालक होते व सदर सोसायटीचे अधिकृत सभासद देखील होते सोसायटी कडून त्यांना **शेअर सर्टिफिकेट नं. १० असे ०५ शेअर** असलेले रक्कम रू.५०/- प्रती शेअर **४६ ते ५०** पर्यंत दिलेले आहेत. **फ्रन्सिस लुईस ट्रक्सो** हे दिनांक **२८/०८/२००९** रोजी मयत झाले त्यांच्या पश्चात त्यांना नाटीवीढाढे फ्रन्सिस ट्रक्सो (पत्नी), हया कायदेशीर वारस आहेत तरी आता सदरचा फ्लॅटचे पूर्ण हक्क व अधिकार वरील वारसांचा आहे तरीही सदर फ्लॅट त्यांना त्यांच्या नावावर आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणाताही हक्क, हितसंबंध असेल तर तो त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१४** दिवसांच्या आत आम्हांस ऑफीस नं. १०२, पहिलामाळा, कुंती सदन, श्री मंगल कार्यालय हॉलच्या खाली, विर सावरकर मार्ग, विरार (पू), ता वसई, जि-पालघर, या पत्त्यावर लेखी पुराव्यासह कळवावा.

**दि. ०२.०८.२०२५** **अॅड. रंजन हाशा पाटील**

# ॲथलिट्सच्या मिनिथॉनला उस्फुर्त प्रतिसाद

**ठाणे :** ॲथलिड्स तर्फे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्याने रविवार ३ ऑगस्ट रोजी लघु पल्ल्याच्या यंग इंडिया मिनिथॉन शर्यतीला उस्फुर्त प्रतिसाद मिळाला आहे. शिवसेना (शिंदे गट) सचिव आणि ठाण्याचे माजी महापौर संजय शिंदे यांच्या हस्ते या शर्यतींच्या अधिकृत टी शर्टचे अनावरण करण्यात आले. सुमारे दोन लाख रुपयांची रोख बक्षिसे असलेल्या या स्पर्धेत १२ वर्षाखालील मुले-मुलींकरता २ किलोमीटर, १५ वर्षाखालील मुले, मुलींसाठी ३ किलोमीटर अंतराची शर्यत ठाणे जिल्हास्तरीय असणार आहे , ठाण्यातील शाळांमधून येणाऱ्या १२,१५ आणि १९ वर्ष वयोगटाच्या धावपटूंना मोफत देण्यात आला आहे. ४५ वर्षावरील गटाची ३ किलोमीटर अंतराची शर्यत सर्वासाठी खुली आहे.. १९ वर्षाखालील मुले, मुलीकरता ५ किलोमीटर आणि खुल्या गटाकरता ७.१ किलोमीटर अंतराची शर्यतही सर्वासाठी आहे. ठाणे शहरातील वृंदावन सोसायटी बस डेपोपासुन सुरुवात होणाऱ्या या स्पर्धेत आतापर्यंत १३०० हुन अधिक धावपटूंनी सहभाग नोंदवला आहे स्पर्धेतील पहिल्या दहा जणांमध्ये स्थान मिळवणाऱ्या धावपटूंना गौरवण्यात येणार असल्याचे शिवछत्रपती पुरस्कार विजेते जेष्ठ प्रशिक्षक दत्ता चव्हाण यांनी सांगितले.




## राज्यात ठाणे बॅडमिंटन अकादमी अव्वल
# अनघा करंदीकरच्या 'दुहेरी मुकुटा'सह राज्य अजिंक्यपद स्पर्धेत 7 पदकं




प्रतिनिधी
■ सातारा

सातारा येथे पार पडलेल्या योनेक्स सनराईस श्री. छत्रपती शिवाजीराजे भोसले स्मृती पहिल्या महाराष्ट्र सीनियर राज्य बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा २०२५ मध्ये ठाणे बॅडमिंटन अकॅडमीच्या खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करत राज्य पातळीवर ठाण्याचे वर्चस्व ठसठशीतपणे सिद्ध केले. २ सुवर्ण, २ रौप्य आणि ३ कांस्य अशा एकूण ७ पदकांची कमाई करत ठाण्याने सर्व वयोगटांमध्ये आपली खेळीमेळीची ताकद दाखवून दिली.या स्पर्धेतील सर्वाधिक लक्ष वेधून घेतलं ते अनघा करंदीकरच्या दुहेरी विजयाने. तिने महिला दुहेरीत सिया सिंगसोबत आणि मिश्र दुहेरीत अमन फारोघ संजयसोबत एकापाठोपाठ एक निर्णायक सामने जिंकत 'दुहेरी मुकुट' पटकावला.

महिला दुहेरीच्या अंतिम सामन्यात अनघा-सिया जोडीने पुण्याच्या श्रुती मुंदडा आणि तनिष्का देशपांडे या गुणी जोडीला १७-२१, २१-१७, २१-१२ अशा तीन सेट्समध्ये हरवत सुवर्ण पटकावले. उपांत्य फेरीत त्यांनी ठाण्याच्याच अमन नौशाद आणि सोनाली मिरखेलकर या जोडीवर १६-२१, २१-१३, २१-१३ असा विजय मिळवला.

मिश्र दुहेरी गटातही अनघा- अमन जोडीने जबरदस्त खेळ सादर करत सुवर्ण पटकावले. या गटात अमन नौशाद – सोनाली मिरखेलकर यांनी रौप्य पदक मिळवले तर सोहम फाटक – इशिता कोरगावकर जोडीने कांस्य पदकावर नाव कोरले.

पुरुष दुहेरीत, कबीर कंझारकरने आपल्या जोडीदारासह सामन्यांमध्ये तगडे प्रदर्शन करत अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात त्यांनी २१-२३, २१-१८, ६-२१ अशा सेट्समध्ये झुंज दिली आणि रौप्य पदक मिळवले याच गटात अर्जुन आणि आर्यन बिराजदार या भावंडांनी दमदार खेळ करत कांस्य पदक मिळवले.

या सातही पदकांमुळे ठाणे बॅडमिंटन अकॅडमीच्या खेळाडूंनी आपल्या मेहनत, शिस्त आणि कौशल्याचा उत्तम परिचय दिला आहे. यासंदर्भात मुख्य प्रशिक्षक श्रीकांत वाड यांनी सांगितले, "खेळाडूंनी सातत्यपूर्ण सराव आणि सामन्यांमधील शांत डोक्याने घेतलेले निर्णय यामुळेच हे यश शक्य झाले आहे. हे राज्यपातळीवरील यश आता राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तराकडे करणाऱ्या वाटचालीची पायाभरणी ठरेल."

या यशावर ठाणे महानगरपालिकेच्या क्रीडा उपायुक्त श्रीमती मीनल पालांडे यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करत सांगितले, "तुमचा हा विजय ठाणे शहरासाठी अभिमानास्पद आहे. हीच जिद्द आणि मेहनत कायम ठेवा. आगामी स्पर्धांसाठी खूप शुभेच्छा."

## भारताच्या पराक्रमी लेकीचं नागपूरमध्ये भव्य स्वागत
# 'बुद्धिबळ क्वीन' दिव्याच्या स्वागताला विमानतळावर प्रचंड गर्दी

प्रतिनिधी
■ नागपूर

नागपूरच्या १९ वर्षीय दिव्या देशमुख हीने सोमवारी २८ जुलैला जॉर्जियामधील बाटुमी येथे अंतिम सामन्यात बाजी मारत फिडे वूमन्स चेस वर्ल्ड कप जिंकण्याची कामगिरी केली. दिव्याने फायनलमध्ये भारताच्याच कोनेरू हम्पीला पराभूत करत इतिहास घडवला. दिव्या यासह चेस वर्ल्ड कप जिंकणारी पहिलीच भारतीय महिला ठरली. तसेच दिव्याने ग्रँडमास्टर होण्याचा बहुमानही मिळवला. दिव्याचं या कामगिरीनंतर भारतात मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आलं. त्यानंतर दिव्या स्वगृही अर्थात नागपुरात पोहचली. दिव्याचं ग्रँडमास्टर झाल्यानंतर नागपूरच्या विमानतळावर जंगी स्वागत करण्यात आलं. यावेळेस दिव्याच्या स्वागतसाठी विमानतळावर एकच गर्दी पाहायला मिळाली. दिव्याच्या स्वागतासाठी विमानतळावर

### शाळकरी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येत उपस्थिती



शाळकरी विद्यार्थी आणि बुद्धिबळ चाहते उपस्थित होते.


नागपूर विमानतळावर पोहचताच दिव्याचं उपस्थितांनी स्वागत केलं. दिव्याला पुष्पगुच्छ देऊन तिचं अभिनंदन करण्यात आलं. तसेच दिव्याला हार घातला. यावेळेस दिव्याची प्रतिक्रिया घेण्यासाठी माध्यमांची एकच झुंबड पाहायला मिळाली. यावेळेस मोठ्या प्रमाणात चाहतेही उपस्थित होते. दिव्यासोबत सेल्फी घेण्यासाठी अनेक चाहत्यांची धावपळ पाहायला मिळाली.

**केवळ सर्वोत्तम कामगिरीवर लक्ष केंद्रित केल्यानेच यशस्वी**

महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेच्या अंतिम लढतीत अनुभवी कोनेरू हम्पीविरुद्ध खेळावे लागणार असल्याचे मी अतिरिक्त दडपण घेतले नाही. मी केवळ सर्वोत्तम कामगिरीवर लक्ष केंद्रित केले आणि त्यामुळेच मला जेतेपद मिळविण्यात यश आले, अशी प्रतिक्रिया ग्रँडमास्टर दिव्या देशमुखने व्यक्त केली.आठवड्याच्या सुरुवातीला १९ वर्षीय दिव्याने बुद्धिबळाच्या जलद प्रकारातील दोन वेळच्या जगज्जेत्या हम्पीला 'टायब्रेकर'मध्ये पराभूत करून महिला विश्वचषक स्पर्धेचे जेतेपद पटकावले. यासह तिने प्रतिष्ठेचा 'ग्रँडमास्टर' किताबही मिळवला. विश्वचषक स्पर्धेपूर्वी तिने 'ग्रँडमास्टर' किताबासाठीचा एकही निकष पूर्ण केला नव्हता. मात्र, या स्पर्धेत मातबर चिनी प्रतिस्पर्धी, तसेच द्रोणावल्ली हरिका आणि हम्पी यांसारख्या भारताच्या ग्रँडमास्टर बुद्धिबळपटूंना नमवत दिव्याने विश्वचषक जिंकणारी पहिली भारतीय महिला ठरण्याचा मान मिळवला. दिव्याचे जॉर्जियाहून नागपुरात बुधवारी आगमन झाले. यानंतर तिने माध्यमांशी संवाद साधला.

# लिओनेल मेस्सी डिसेंबरमध्ये भारत दौऱ्यावर येणार...
## 14 डिसेंबरला मुंबईतील कार्यक्रमात सहभाग

वृत्तसंस्था
■ ब्युनोस आयर्स



अर्जेंटिनाचा स्टार फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी डिसेंबरमध्ये भारत दौऱ्यावर येणार आहे.. मेस्सी १४ वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर भारतात येत आहे. तो १३ ते १५ डिसेंबर दरम्यान भारतात असेल आणि एकूण तीन शहरांना भेट देईल.

मेस्सी १३ ते १५ डिसेंबर दरम्यान कोलकाता, दिल्ली आणि मुंबईला भेट देणार आहे. तो १४ डिसेंबर रोजी मुंबईतील वानखेडे स्टेडियममध्ये होणाऱ्या कार्यक्रमात सहभागी होईल. मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए) च्या एका सूत्राने एका मोठ्या इंग्रजी वृत्तपत्राला सांगितले की, काही क्रिकेटपटू देखील या कार्यक्रमात सहभागी होतील.

**ईडन गार्डन्स स्टेडियमलाही भेट देणार**

याशिवाय, मेस्सी कोलकात्यालाही भेट देणार आहे आणि ईडन गार्डन्स येथे त्यांचा सन्मान केला जाईल. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी देखील या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकतात. मेस्सी कोलकात्यात मुलांसाठी फुटबॉल कार्यशाळेचे आयोजन करणार आहेत आणि फुटबॉल क्लिनिकचेही उद्घाटन करणार आहे.



**मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते, मंत्री छगन भुजबळ यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला पदाधिकारी सौ. समृद्धी संतोष जंगम, सौ. दीप्ती दीपक शिंदे, सौ. अंजली राजेश जुमलेदार यांना नरिमन पॉईंट येथील प्रदेश कार्यालयात नियुक्ती पत्रे दिली. यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या मुंबई महिला अध्यक्षा सौ. आरती साळवी, महाराष्ट्र सरचिटणीस सुरेखा पेडणेकर आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.**

# पालिकेच्या 1990 च्या परिपत्रकानुसार 240 पेक्षा अधिक दिवस काम करीत असलेले कामगार कायम कधी होणार?

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेत ८ हजार कंत्राटी कामगारांना सेवेत कायम करण्यात येणार असल्याचे प्रशासन व संघर्ष समितीच्या बैठकीत ठरले मात्र पालिका प्रशासनाने १९९० चे २४० दिवसांचे परिपत्रक, प्रामुख्याने खाडाबदली कामगारांना म्हणजेच एल ओ डिआर आणि पि टि डिआर यांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्यासाठी होते. त्यांना कायम होण्यासाठी लागणारा ५ ते १० वर्षांचा कालावधी कमी करून २४० दिवसांनंतर कायम करण्याबाबत होते. पण हे कामगार ८ ते १० वर्ष घानीचे काम करून सुद्धा त्यांना अद्याप कायम करण्यात आले नाही. मात्र या परिपत्रकाचा फायदा खऱ्या अर्थाने कंत्राटी कामगारांना झाला आहे. अशी भावना ही खडा बदली कामगार व्यक्त करीत असून आपल्यावर होणारा हा अन्याय दूर व्हावा अशी त्यांची मागणी आहे. पालिकेत खडा बदली कामगार ४८६४ इतके आहेत.

सध्या बृहन्मुंबई महानगरपालिकेतील एलओ डिआर आणि पिटि डिआर कामगारांमध्ये सध्या गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे, २८ जुलै २०२५ रोजी बृहन्मुंबई महानगर पालिकेतील काही कामगार संघटना आणि प्रशासन यांच्यात एक महत्त्वाचा करार झाला आहे, या करारा अगोदर खाजगी करणाच्या भितीपोटी काही बलाढ्य युनियनच्या पुढाकाराने,घ क व्य खात्यातील सर्वच कामगारांकडून मतदान करवून घेतले की महापालिका बंद पाडायची का? तर हो म्हणून जास्तीत जास्त कामगारांनी मतदान केले याचा फायदा घेवून,कंत्राटी कामगारांना कायम करण्याचा निर्णय झाला.

**४,८६४ एलओडीआरना सलग सेवेचे फायदे द्या ! - अशोक जाधव**

खाडा बदली कामगारांच्या व्यथेबद्दल बोलताना संघर्ष समितीचे अध्यक्ष तसेच म्युनिसिपल मजदुर युनियनचे अध्यक्ष अशोक जाधव म्हणाले, मुंबई महानगरपालिकेमध्ये १९८५ सालापासून निरनिराळ्या खात्यामध्ये खाडाबदली कामगार यांना एल.ओ. डीआर म्हटले जात होते. विशेष करून हे कामगार साफसफाई खाते, आरोग्य खाते आणि मलेरीया खात्यामध्ये काम करत होते. यापैकी काही कामगार २००४ साली आणि काही कामगार २००७ साली मुंबई महापालिकेमध्ये कायम करण्यात आले. १९८५ पासून सेवासातत्याचा लाभ न दिल्यामुळे ४,८८४ कामगारांचे आर्थिक नुकसान झालेले आहे, त्याबाबत म्युनिसिपल मजदूर युनियन, मुंबईने औद्योगिक न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. त्यांनासुध्दा लवकरच पूर्वलक्षी प्रभावाने लाभ मिळवून देण्याकरीता संघटना प्रयत्न करीत आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेच्या अटीत शिथिलता
## 'मॅनहोलकडून मशिनहोलकडे' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा - उपमुख्यमंत्री अजित पवार

प्रतिनिधी
■ मुंबई




डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेंतर्गत सफाई कामगारांना सेवानिवृत्तीनंतर किंवा सेवेत असताना मृत्यूनंतर त्यांच्या पात्र वारसास मोफत मालकी तत्वावर सदनिका प्रदान केल्या जातात. सध्या २५ वर्षे किंवा त्याहून अधिक कालावधी सेवा केलेल्या सफाई कामगारांना सदनिका दिल्या जातात. सेवा कालावधीची ही अट २५ वर्षांवरून २० वर्षे करण्याचा प्रस्ताव नगरविकास विभागाने तयार करून तो मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

सफाई कामगारांच्या विविध प्रश्नांबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, आमदार संजय मेश्राम, आमदार अतुल भातखळकर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव डॉ.राजगोपाल देवरा, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख यांच्यासह नगर विकास,सामाजिक न्याय विभागाचे वरिष्ठ अधिकारी. तसेच राज्य सफाई कर्मचारी आयोग व सफाई कर्मचारी संघटना यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, राज्यातील हाताने मैला उचलण्याची प्रथा बंद करण्यासाठी राज्याने 'मॅनहोलकडून मशिनहोलकडे' ही योजना सुरू केली असून, या माध्यमातून गटारे, सिवेज लाइन, सेप्टिक टाक्या यांची सफाई यांत्रिकीकरणाच्या मदतीने केली जाणार आहे. या योजनेंतर्गत स्वच्छतेच्या कार्यासाठी यांत्रिक उपकरणे, आधुनिक वाहने, तसेच आपत्कालीन प्रतिसादासाठी स्वच्छता युनिट्स खरेदी करण्यात येणार आहेत. या योजनेची अंमलबजावणी नगरविकास विभागामार्फत केली जात असून, यासाठी रुपये ५०४ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यासाठी सन २०२४–२५ च्या पावसाळी अधिवेशनात रुपये १०० कोटी निधीची पुरवणी मागणी मंजूर करून ३१ मार्च २०२५ रोजी नगरविकास विभागास वितरित करण्यात आली आहे. गटारांची सफाई करण्यासाठी यांत्रिक उपकरणे, स्वच्छता यंत्रसामग्री, रोबोटिक युनिट्स व आपत्कालीन वाहने यांची खरेदी प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे. या वाहनाची देखभाल व दुरुस्ती ही तीन वर्षे संबंधित एजन्सीने करावी. तसेच एजन्सीने सफाई कामगारांना वाहन चालवण्याबाबतचे प्रशिक्षण या कालावधीत द्यावे.

लाड-पागे समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपालिका यांनी तात्काळ करावी. ज्या महानगरपालिका अथवा नगरपालिका याबाबत अंमलबजावणी करणार नाहीत त्यांच्याविरोधात कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश त्यांनी यावेळी दिले. तसेच, राज्यात कार्यरत असलेल्या सफाई कामगारांची संख्या किती आहे, यासंदर्भातील सविस्तर अहवाल प्रत्येक महानगरपालिका व नगरपालिका यांनी नगरविकास विभागास सादर करणे बंधनकारक असल्याचे उपमुख्यमंत्री पवार यांनी यावेळी सांगितले.

# गोकुळाष्टमी निमित्त राज्यातील 1.50 लाख गोविंदांना विमा संरक्षण
## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांच्या मागणीला यश

प्रतिनिधी
■ मुंबई

गोकुळाष्टमी अर्थात दहिहंडी हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अत्यंत महत्त्वाचा सण असून या उत्सवात राज्यातील हजारो युवक-युवती "गोविंदा" म्हणून थरावर थर रचत हंडी फोडण्यासाठी सहभागी होतात. मात्र गेल्या काही वर्षांत सरावादरम्यान आणि प्रत्यक्ष उत्सवाच्या दिवशी अनेक अपघात घडले असून, अनेक गोविंदांना दुखापतींचा सामना करावा लागतो.

गोविंदांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विमा संरक्षण मिळावे म्हणून परिवहन मंत्री मा. ना. प्रताप सरनाईक आणि युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथ शिंदे साहेब यांच्याकडे मागणी केली होती.

या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत यंदा राज्यातील सुमारे १.५० लाख गोविंदांना "गोविंदा समन्वय समिती (महा.)" या नियोजन समितीच्या माध्यमातून "ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी" चे विमा संरक्षण देण्यात येणार आहे. "ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी" ने सादर केलेला प्रत्येक गोविंदाकरिता रु. ७५/- दर क्रीडा विभागातर्फे मान्य करण्यात आला असून त्यानुसार विमा हप्त्याची रक्कम विमा कंपनीला अदा करण्यासाठी राज्य क्रीडा विकास निधीतून रु. १,१२,५०,०००/- इतकी रक्कम उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई यांच्या खात्यात वर्ग करण्यात आले आहे.

युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांनी सांगितले की, मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस जी, उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथ शिंदे साहेब आणि उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार यांनी गोविंदांसाठी आवश्यक असलेली विमा कवच योजना तातडीने मंजूर करून दिल्याबद्दल राज्यभरातील लाखो गोविंदांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहेत.गेल्या वर्षी १.२५ लाख गोविंदांना विमा संरक्षण देण्यात आले होते. मात्र, काही गोविंदा त्यापासून वंचित राहिले. यंदा ही त्रुटी दूर करत विमा कवचाची मर्यादा वाढवून १.५० लाख गोविंदांपर्यंत हे संरक्षण पोहोचवले जाणार आहे.

# पालिकेच्या 'आपली चिकित्सा योजना' सुरु; 100 आरोग्य संस्थांमध्ये कार्यवाही

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईकर नागरिकांना विविध स्वरुपाच्या रक्त चाचण्या अत्यल्प दरात आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध करुन देणे, हा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य सेवेचा अविभाज्य घटक आहे. या अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १०० आरोग्य संस्थांमध्ये आज १ ऑगस्ट २०२५ पासून आपली चिकित्सा योजनेचा प्रारंभ करीत आहेत. तसेच, महानगरपालिकेच्या सर्व दवाखान्यांमध्ये १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत ही सेवा सुरू करण्याचे उद्दिष्ट आहे. 'आपली चिकित्सा' ही महानगरपालिकेची एक महत्वाकांक्षी योजना आहे. या योजनेचा उद्देश महानगरपालिकेच्या आरोग्य संस्थांमध्ये बाह्यस्रोताद्वारेनागरिकांना नाममात्र दरात रक्त चाचणी सुविधा उपलब्ध करून देणे, हा आहे.

सदर योजना अंतर्गत, मूलभूत व प्रगत तपासण्या उपलब्ध करून दिल्या जात आहेत. पालिकेची उपनगरीय रुग्णालये, दवाखाने, आपला दवाखाना, पॉलिक्लिनिक, प्रसूतिगृहे तसेच विलेपार्ले स्थित डॉ. रू. न. कूपर रुग्णालय व जोगेश्वरी स्थित हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर महानगरपालिका रुग्णालय यांचा समावेश आहे.

दरम्यान, जून २०२५ मध्ये महानगरपालिकेमार्फत राबविलेल्या निविदा प्रक्रियेनुसार 'लाइफनिटी हेल्थ' या संस्थेची सेवा पुरवठादार म्हणून निवड करण्यात आली आहे. आपली चिकित्सा' योजना अंतर्गत महाराष्ट्र राज्य शासनाच्या आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध असणा-या व तज्ज्ञ समितीच्या शिफारशीनुसार ६६ मूलभूत तपासण्या व १७ प्रगत अशा ८३ तपासण्यांचा समावेश करण्यात आला आहे.

**या ठिकाणी होणार सेवा कार्यान्वित**

१६ उपनगरीय रुग्णालये, ३० प्रसूतिगृहे, ५ विशेष रुग्णालये, डॉ. आर. एन. कूपर रुग्णालय, एचएचबीटी ट्रॉमा रुग्णालय, विभाग 'ए' ते 'ई' मधील सर्व महानगरपालिका दवाखाने

**व्हॉट्सॲपद्वारे मिळणार रक्त चाचणी अहवाल**

पालिकेच्या धोरणांतर्गत रुग्णांना रक्त चाचणी अहवाल व्हॉट्स ॲपद्वारे उपलब्ध होऊ शकतील, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, आरोग्य माहिती व्यवस्थापन प्रणाली (HMIS) द्वारे सर्व रुग्णांच्या माहितीचे संकलन, व्यवस्थापन करण्यात येणार आहे.

# पालिका जलअभियंता विभागातील कामगारांच्या प्रलंबित मागण्यांसाठी वरळी हबवर मोर्चा
## ३१ ऑक्टोबरपर्यंत मागण्या मान्य करण्याचे आश्वासन

प्रतिनिधी
■ मुंबई

दि म्युनिसिपल युनियनच्या वतीने काल बृहन्मुंबई महानगरपालिकेतील जल खाते कामगारांचे अनेक प्रलंबित प्रश्नांकडे काल अभियंता विभागा चे लक्ष वेधण्यासाठी काल युनियनचे सरचिटणीस रमाकांत बने यांच्या नेतृत्वाखाली वरळी हब मधील जल अभियंता विभागावार संध्याकाळी ५ वाजता मोर्चा काढण्यात आला होता. मागण्या ३१ ऑक्टोंबर पर्यंत मान्य करण्याचे आश्वासन जल अभियंत्यांनी दिले. मात्र मागण्या मान्य न झाल्यास कामगार संप करतील असे युनियनचे सरचिटणीस रमाकांत बने यांनी सांगितले.

पालिकेच्या जल अभियंत्यांकडे १. विविध संवर्गाची रिक्त व पदोन्नतीची पदे भरण्यात यावीत, २. पहिल्या, दुस-या व तिसऱ्या कालबद्ध पदोन्नतीचा फायदा देण्याबाबत. ३. सेवा पुस्तिकेची दुय्यम प्रत देण्याबाबत.४.



मानीव कायमत्व देण्याबाबत.५. गोपनीय अहवालाची प्रत / प्रतवारी देण्याबाबत.६. कर्मचा-यांना कर्तव्यसूची देण्याबाबत. ७. परिपत्रक क्र. एलओ-१० नुसार रजांची नोंद करण्याबाबत. ८. अतिकालीन भत्याचे योग्य पद्धतीने अधिदान करण्याबाबत. ९. चौकीवरून कामाच्या ठिकाणी जाण्या येण्यासाठी वाहन उपलब्ध करून देण्याबाबत.१०. परिपत्रक क्र. साप्रवि/ उप प्रमुख लेखापाल (आस्था. २)/ आरजीसेल/१४, दि. २३.१०.२०२३ नुसार (समान कामाला समान वेतन) वेतननिश्चिती करण्याबाबत. ११. परिपत्रक क्र. प्रकाअ/०५ दि.८.८.२०१९ नुसार कामगारांना पदनामाचेच काम देण्याबाबत.१२. चौक्यांची पुर्नबांधणी करुन आवश्यक त्या सुविधा पुरविण्याबाबत.१३. कामगारांना घाणकाम भत्ता सुरु करण्याबाबत. आदी प्रभावित मागण्याची पूर्तता करण्याविषयीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला असता या सर्व मागण्यांबाबतन ३१ ऑक्टोबर २०२५ च्या आत अंमलबजावणी करण्याचे जल अभियंता यांनी मान्य केले आहे. जर ३१ ऑक्टोबर २०२५ च्या आत अंमलबजावणी झाली नाही तर, १ नोव्हेंबर, २०२५ रोजी मुंबई महानगरपालिकेच्या पाणी खात्यातील सर्व कामगार कायदेशीर संप करतील. असे रमाकांत बने यांनी सांगितले.

# लोकशांती को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या सल्लागारपदी जीवन भोसले यांची निवड



**मुंबई :** लोकशांती को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या वार्षिक सोहळ्यात सामाजिक कार्यकर्ते जीवन भोसले यांच्यासाठी मोठा गौरवशाली क्षण घडला आहे. समाजसेवक, कोल्हापूरचे सुपुत्र आणि सामाजिक कार्यासाठी सातत्याने सक्रिय असलेले जीवन भोसले यांची लोकशांती को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी या संस्थेच्या सल्लागारपदी निवड करण्यात आली. सोसायटी च्या सल्लागारपदी जीवन भोसले यांची ही निवड झाल्याबद्दल संस्थेकडून त्यांचा सन्मान करण्यात आला. भोसले यांच्या अनुभवाचा आणि कार्यनिष्ठेचा संस्थेला निश्चितच मोलाचा फायदा होईल, असा विश्वास संस्थेचे अध्यक्ष विलास पाटील यांच्यासह सर्व सभासदांनी व्यक्त केला आहे. भोसले यांची ही निवड म्हणजे त्यांच्या कार्याची समाजाने दिलेली एक पोच पावती आहे. सोसायटीच्या सल्लागारपदी जीवन भोसले यांची निवड झाल्याबद्दल समाजसेवक निलेश मानकर यांनीही भोसले यांना शुभेच्छा देत सन्मान केला.

# कांदिवलीमध्ये भव्य कावड यात्रा; 'बोल बम'च्या जयघोषाने परिसर दुमदुमला
## माजी नगरसेवक कमलेश यादव यांनी केले होते आयोजन



प्रतिनिधी
■ मुंबई

विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल यांच्या संयुक्त विद्यमाने कांदिवलीतील गणेश नगर येथून एक विशाल कावड यात्रा काढण्यात आली, ज्यामध्ये सहभागी होण्यासाठी आणि कावडीयांना प्रोत्साहन देण्यासाठी शिवभक्तांचा मोठा जमाव जमला होता. संपूर्ण परिसर 'बोल बम'च्या जयघोषाने दुमदुमून गेला. ही कावड यात्रा नीलकंठ नगर, गणेश नगर, मालाड, मालवणी इत्यादी भागातून सुरू झाली आणि मार्वे रोड मार्गे मढ येथील किलेश्वर महादेव मंदिरात पोहोचली, जिथे हजारो शिवभक्तांनी श्रद्धापूर्वक शिवलिंगावर जलाभिषेक केला.

गणेश नगरच्या मिथिला हनुमान मंदिरापासून सुरू झालेल्या या कावड यात्रेत, वॉर्ड क्रमांक ३१ चे माजी नगरसेवक कमलेश यादव यांनी त्यांचे सहकारी गोपाल झा, मुकेश चौधरी आणि इतर स्थानिक लोकांच्या मदतीने सर्व कावडांमध्ये पाणी भरून पवित्र यात्रेला सुरुवात केली आणि सर्वजण कावडीयांची सेवा करण्यात व्यस्त होते.कमलेश यादव म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून येथून ही भव्य आणि पारंपारिक कावड यात्रा काढली जाते ज्यामध्ये दरवर्षी हजारो शिवभक्त सहभागी होतात. ही यात्रा गणेश नगर, लालजी पाडा, ९० फूट रस्त्यावरून मढ येथील किलेश्वर महादेव मंदिरात जाते.

## भारतात राष्ट्रीय हिताच्या आधारेच व्यापार होणार परराष्ट्र मंत्रालयाचा अमेरिकेस संदेश

**नवी दिल्ली :** संरक्षण क्षेत्रातील खरेदी पूर्णपणे भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या गरजा आणि धोरणात्मक मूल्यांकनाच्या आधारे ठरते. त्याचप्रमाणे, भारताची ऊर्जा गरज पूर्ण करण्यासाठी आम्ही जागतिक परिस्थिती आणि बाजारात उपलब्धतेनुसार निर्णय घेतो, अशा शब्दात भारताने अमेरिकेस ठणकावले आहे. अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावरील नवीन टॅरिफ लावण्याचे कारण देताना उच्च व्यापार अडथळे, तसेच रशियन तेल आणि संरक्षणसामग्रीवर भारताच्या अवलंबतेचा उल्लेख केला. मात्र, याला उत्तर देताना परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, एका तिसऱ्या देशाच्या दृष्टिकोनातून भारताच्या संबंधांचा आढावा घेणे अयोग्य आहे. भारताचे विविध देशांशी असलेले संबंध गुणात्मकतेवर आधारित असतात. रशियासोबत भारताचे संबंध दीर्घकालीन आणि विश्वासार्ह आहेत. संरक्षण क्षेत्रातील खरेदी पूर्णपणे भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या गरजा आणि धोरणात्मक मूल्यांकनाच्या आधारे ठरते. त्याचप्रमाणे, भारताची ऊर्जा गरज पूर्ण करण्यासाठी आम्ही जागतिक परिस्थिती आणि बाजारात उपलब्धतेनुसार निर्णय घेतो, असे जयस्वाल यांनी स्पष्ट केले. भारत-अमेरिका संबंधांनी वेळोवेळी अनेक बदल आणि आव्हानांचा सामना केला असूनही हे संबंध टिकून राहिले आहेत, यावर जयस्वाल यांनी भर दिला.

# खासदारांना रोखण्यासाठी संसदेत कमांडो

## काँग्रेसच्या दाव्याने खळबळ

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

सध्या सुरु असलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विरोधकांनी अनेक मुद्द्यावरून सत्ताधाऱ्यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला आहे. अशामध्ये अनेकदा विरोधक खासदार आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या दहाव्या दिवशी म्हणजेच शुक्रवारी बिहार मतदार पडताळणीच्या मुद्द्यावरून विरोधकांनी गोंधळ घातला. यावेळी त्यांना रोखण्यासाठी राज्यसभेत खासदारांना रोखण्यासाठी कमांडो बोलावल्याचे गंभीर आरोप कॉंग्रेसने केले आहेत. त्यामुळे



हा लोकशाहीच्या इतिहासातील काळा दिवस असल्याचे म्हटले आहे.

काँग्रेस खासदार प्रमोद तिवारी या घटनेबद्दल म्हणाले की, "आज कमांडो तैनात करण्यात आले होते. काही जण म्हणत आहेत की ते सीआयएसएफ आहे, तर काही जण वेगळेच काही म्हणत आहेत. त्या जवानांनी सदस्यांना कर्मचाऱ्यांना भेटण्यापासून रोखले. आमच्या महिला सदस्यांना पुरुष जवानांनी रोखले. ज्या पद्धतीने लोकांना सभागृहाबाहेरून बोलावण्यात आले आणि खासदारांना जबरदस्तीने वेलमध्ये जाण्यापासून रोखण्यात आले ते आक्षेपार्ह आहे. सर्व काही कॅमेऱ्यात कैद झाले आहे." असे आरोप करताना सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला.

काँग्रेसने केलेल्या आरोपावर केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू हे म्हणाले की, मला मिळालेल्या माहितीनुसार, काही खासदार गोंधळ घालताना आक्रमक झाले. त्यांना फक्त थांबवण्यात आले, असे स्पष्टीकरण दिले. दुसरीकडे काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी राज्यसभेचे उपसभापती हरिवंश यांना पत्र लिहिले आहे. मल्लिकार्जुन खर्गेनी यांनी राज्यसभेच्या उपसभापतींना लिहिलेल्या पत्रात लिहिले आहे की, ज्या पद्धतीने सीआयएसएफ कर्मचाऱ्यांना सभागृहाच्या वेलमध्ये आणण्यात आले ते अत्यंत आक्षेपार्ह आहे. आम्ही त्याचा तीव्र निषेध करतो. आम्हाला आशा आहे की, भविष्यात जेव्हा सदस्य सार्वजनिक हिताचे महत्त्वाचे मुद्दे उपस्थित करत असतील. तेव्हा सीआयएसएफ कर्मचारी सभागृहाच्या वेलमध्ये येणार नाहीत.

मंत्री किरेन रीजीजू म्हणाले की, "संसद सदस्यांनी सुरक्षा वाढवण्याची मागणी केली, म्हणून CISF तैनात करण्यात आले. सभागृहात, सदस्य कधीकधी सत्ताधारी पक्षाच्या टेबलावर आणि वेलजवळ उभे राहतात. त्यांना असे करण्यापासून रोखण्यासाठी सुरक्षा तैनात करण्यात आली आहे. कोणत्याही खासदाराला बोलण्यापासून रोखले जाणार नाही. खासदारांनी काही दुर्भावनापूर्ण कृत्य केल्याशिवाय सभागृहातील मार्शल आणि सुरक्षा कर्मचारी कोणतीही कारवाई करणार नाहीत. मी आजच्या घटनेबद्दल राज्यसभा सचिवालयाकडून माहिती घेतली आहे. त्यांच्या मते, काही खासदार आक्रमक झाले, त्यांना थांबवण्यात आले." असे स्पष्टीकरण दिले आहे.

# रमीरावांना क्रीडामंत्रीपद देणे हा सरकारच्या असंवेदनशीलतेचा पुरावा

## शेतकऱ्यांचा अपमान करणाऱ्या मंत्र्याचे प्रमोशन केल्याचा आरोप

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

राज्य मंत्रिमंडळातील खातेबदलात माणिकराव कोकाटे यांच्याकडे क्रीडा खात्याची जबाबदारी देण्यावरून खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. 'रमीरावांना' कृषी खात्यातून बदलून क्रीडामंत्रीपद देणे, हे सरकारच्या असंवेदनशीलतेचे जिवंत उदाहरण आहे. ज्यांनी राज्याचा आणि शेतकऱ्यांचा अपमान केला, त्यांनाच प्रमोशन दिले जात आहे," अशा शब्दांत त्यांनी सरकारचा तीव्र निषेध केला. नवी दिल्लीत माध्यमांशी बोलताना त्यांनी सरकारवर टीकेची झोड उठवली.

नुकत्याच झालेल्या खातेबदलात माणिकराव कोकाटे यांच्याकडील कृषी खाते काढून ते दत्तात्रय भरणे यांना देण्यात आले, तर भरणे यांच्याकडील क्रीडा व युवक कल्याण खाते कोकाटे यांच्याकडे सोपवण्यात आले. या निर्णयावर सुप्रिया सुळे यांनी तीव्र आक्षेप घेतला. त्या म्हणाल्या, "अन्नदात्याचा अपमान करणाऱ्या मंत्र्याचा राजीनामा घेण्याऐवजी सरकारने त्यांचे प्रमोशन केले आहे. या सरकारमधील मंत्री डान्सबार चालवण्यापर्यंत पोहोचले आहेत, त्यामुळे त्यांनी आणखी काय करायचे बाकी ठेवले आहे?" असा खोचक सवालही त्यांनी उपस्थित केला.



क्रीडा खात्याच्या जबाबदारीवर बोलताना सुळे यांनी केंद्र सरकारचे उदाहरण दिले. "केंद्रात किरेन रिजीजू क्रीडामंत्री असताना त्यांनी 'खेलो इंडिया'सारखा उत्कृष्ट उपक्रम सुरू केला. आम्ही विरोधक असलो तरी चांगल्या कामाचे कौतुक करतो. आज राज्यातील अनेक तरुण क्रीडा क्षेत्रात करिअर घडवू पाहत असताना, 'रमी' खेळणाऱ्या मंत्र्याला क्रीडामंत्री बनवणे हे अत्यंत दुर्दैवी आहे. संसदेतही इतर खासदार मला याबद्दल विचारतात, ही राज्यासाठी भूषणावह बाब नाही," अशी खंत त्यांनी व्यक्त केली. यावेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय घडामोडींवरही भाष्य केले. अमेरिकेने भारतावर लादलेल्या आयात शुल्काबाबत बोलताना त्या म्हणाल्या, "अमेरिकेची पाकिस्तानसोबतची मैत्री दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यांनी भारत आणि पाकिस्तानला एकाच तराजूत तोलण्यास सुरुवात केली आहे, ही एक गंभीर बाब आहे. याविषयी सरकारने संसदेत पुरेशी माहिती दिलेली नाही. देशातील तज्ज्ञांचे सहकार्य घेऊन सरकारने यावर तातडीने तोडगा काढावा, जेणेकरून देशाच्या व्यापाराचे नुकसान होणार नाही," अशी मागणीही त्यांनी केली.

पान ९ वरुन

### अवघ्या 90 मिनिटांत मुंबईतून पुणे गाठा!

मुंबईपासून बंगळुरूपर्यंत नवीन महामार्ग तयार केला जात आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या कार्यक्रमात सत्काराला उत्तर देताना केली. हा महामार्ग अटल सेतूला जोडण्यात येणार आहे. या महामार्गामुळे मुंबईहून पुण्याला केवळ दीड तासात पोहोचणे शक्य होणार आहे, असे नितीन गडकरी म्हणाले. त्याचवेळी माझ्या विभागाकडे भरपूर पैसा पडलेला आहे आणि तो खर्च करणारे नाहीत, याकडे गडकरींनी सर्वांचे लक्ष वेधले. पुण्यातील टिळक स्मारक मंदिरात हा पुरस्कार सोहळा झाला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, लोकमान्य टिळक स्मारक समितीचे अध्यक्ष रोहित टिळक आदी उपस्थित होते.

### वेट अँड वॉच... सबका नंबर आएगा !

अमित शाहांच्या भेटीत देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलेले आहे की, या अशा लोकांबरोबर मला काम करणे अवघड झाले आहे. सरकारची, राज्याची बदनामी होत आहे. निर्णय घ्यावा लागेल, असे फडणवीस यांनी अमित शाह यांना भेटून सांगितल्याचा दावा त्यांनी केलाय.

**शेवटच्या क्षणापर्यंत धनंजय मुंडे यांना वाचवण्यात आले**

संसदीय लोकशाहीत विरोधी पक्षाचा आवाज महत्त्वाचा असतो. सध्याचे राज्यकर्ते त्या भूमिकेत नाहीत . या मंत्र्यांना जावे लागेल. शेवटच्या क्षणापर्यंत धनंजय मुंडे यांना वाचवण्यात आले. दिल्लीने अजित पवार यांना न सांगता भुजबळ यांना मंत्री केले, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे.


## प्रेम जुळवा, बोनस मिळवा...

# ऑफिस सहकाऱ्याला डेटवर पाठवल्यास मिळणार 42000 रुपये

**Refer-a-Date स्कीम चर्चेत**

वृत्तसंस्था
सॅन फ्रान्सिस्को

अनेक टेक कंपन्यांमध्ये कर्मचाऱ्यांना पिंग-पॉन्ग टेबल, अमर्याद स्नॅक्स किंवा इतर ठराविक सुविधा मिळतात. पण एका कंपनीने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी थेट 'डेटिंग'शी संबंधित एक अजब योजना आणली आहे. सॅन फ्रान्सिस्कोस्थित टेक स्टार्टअप 'क्लूली' चे सीईओ चुंगिन 'रॉय' ली यांनी एक नवीन कंपनी धोरण जाहीर केले आहे, ज्यानुसार जो कर्मचारी आपल्या दुसऱ्या सहकाऱ्यांसाठी 'डेट' म्हणजेच जोडीदार शोधून यशस्वीरित्या डेटवर पाठवेल, त्याला तब्बल 500 डॉलर (अंदाजे 42000 रुपये) रोख बोनस



दिला जाईल.

सीईओ ली यांनी आपल्या लिंक्डइन पोस्टद्वारे ही घोषणा केली आणि त्यानंतर टेक जगतात आणि सोशल मीडियावर यावर जोरदार चर्चा सुरू झाली आहे. ही केवळ एक गंमत नसून कंपनीच्या अधिकृत 'कल्याणकारी धोरणा'चा भाग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

क्लूलीचे सीईओ चुंगिन 'रॉय' ली यांनी आपल्या लिंक्डइन पोस्टमध्ये या योजनेची सविस्तर माहिती दिली. त्यांनी लिहिले आहे की, जर कोणताही कर्मचारी दुसऱ्या कर्मचाऱ्यासाठी डेट रेफर करेल (आणि तो कर्मचारी त्या डेटमुळे आनंदी असेल), तर रेफर करणाऱ्या कर्मचाऱ्याला 500 डॉलरचा एकरकमी रोख बोनस मिळेल."

या योजनेची सर्वात खास गोष्ट म्हणजे हा बोनस 'स्टॅकेबल' आहे, म्हणजेच एकापेक्षा जास्त सहकाऱ्यांसाठी डेट शोधल्यास प्रत्येक वेळी बोनस मिळत राहील.

आपल्या पोस्टच्या शेवटी ली यांनी गंमतीने लिहिले, "जर तुम्हाला क्लूली टीममधील कोणी आकर्षक वाटत असेल, तर कृपया मला थेट मेसेज करा. जोपर्यंत आपल्या सर्वांची सुखाने लग्नं होत नाहीत, तोपर्यंत डेटिंग हे आपल्या कंपनीच्या संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग आहे आणि राहील."

या उपक्रमाचं उद्दिष्ट म्हणजे कर्मचाऱ्यांमध्ये जवळीक निर्माण करणं आणि त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातही आनंददायी बदल घडवून आणणं, असं त्यांनी म्हटलं आहे.

# कमला हॅरिस यांनी राजकारण सोडण्याची केली घोषणा

वॉशिंग्टन

अमेरिकेच्या माजी उपराष्ट्रपती कमला हॅरिस यांनी राजकारण सोडण्याची घोषणा केली आहे. एका कार्यक्रमात दिलेल्या मुलाखतीत त्यांनी सांगितले की, त्या आता कॅलिफोर्नियाच्या गव्हर्नर पदासह कोणत्याही राजकीय पदासाठी निवडणूक लढवणार नाहीत.

हॅरिस म्हणाल्या की, अमेरिकेची राजकीय व्यवस्था "तुटलेली" आहे आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी मी पुरेशी मजबूत नाही कॅलिफोर्नियाच्या गव्हर्नर राहिलेल्या हॅरिस म्हणाल्या की, त्यांनी त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत जनतेची सेवा केली आहे.

# देशातील १० लाख आशा सेविकांसाठी समान कायदा व वेतनाचा अवलंब करावा!

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

विविध राज्यांमध्ये देण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या मांनधनावर काम करणाऱ्या तसेच गेल्या काही वर्षा पासून आपल्या न्याय हक्कासाठी संघर्ष लढणाऱ्या देशातील सुमारे १० लाख आशा सेविकांसाठी देशात समान कायदा करण्यात यावा व समान वेतन देण्यात यावे, अशी मागणी मुंबई उत्तर पश्चिम लोकसभेचे खासदार रविंद्र वायकर यांनी लोकसभेत शून्य प्रहरावेळी केली.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत काम करणाऱ्या आशा वर्कर



व गटप्रवर्तकाना केंद्र शासनाच्या योजनांनुसार काही मोबदला व राज्य शासनातर्फे काही मोबदला देण्यात येतो. संपूर्ण देशभरात सुमारे १० लाख आशासेविका वर्कर काम करत आहेत. २००५ पासून गावांमधील जनतेच्या आरोग्यासाठी तसेच आरोग्य सेवा तळागाळातील जनतेपर्यत पोचवण्यासाठी ह्या आशासेविका काम करत आहेत. गेली २० वर्ष त्या निस्वार्थ काम करीत असताना त्या अद्यापही विविध सरकारी सुविधांपासून वंचित आहेत. आपल्या विविध मागण्यांसाठी त्या सातत्याने संघर्ष करत आहेत. त्यांच्या मागण्यांचे निवेदन त्यांनी खासदार वायकर यांची भेट घेऊन दिले होते. त्यावेळी याप्रश्नी केंद्र शासनाचे लक्ष वेधण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी आशासेविका यांना दिले होते. त्यानुसार खा. वायकर यांनी शून्य प्रहरावेळी आशासेविकांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत मुद्दा उपस्थित केला.

**आशासेविकांच्या मागण्या**

१) यात आशासेविकांना समान पगार, समान कायदा देण्यात यावा. २) त्यांना सामाजिक सुरक्षतेच्या कक्षात आणून त्यांच्यासाठी भविष्य निर्वाह निधी तसेच निवृत्ती वेतनाची सुविधा देण्यात यावी. ३) सर्व आशासेविकासह त्यांच्या कुटुंबाना आरोग्य विमा व जीवन विमाचे कवच देण्यात यावे. ४) त्यांना केवळ कार्यकर्तीचा दर्जा न देता कर्मचारीचा दर्जा, देण्यात यावा.

# कंगना रणौतला पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचा झटका

## मानहानी प्रकरणातील याचिका फेटाळली

वृत्तसंस्था
चंदीगड

अभिनेत्री आणि भाजपाच्या खासदार कंगना रणौतने दाखल केलेली याचिका शुक्रवारी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. शेतकरी आंदोलनाबाबत केलेल्या एका टीप्पणीनंतर तिच्याविरोधात मानहानीचा खटला दाखल करण्यात आला होता. यावर कंगना रणौतने न्यायालयात धाव घेत ही तक्रार रद्द करण्याची विनंती केली होती. उच्च न्यायालयाने ही विनंती रद्द केल्याने



आता प्रकरणातील खटला पुन्हा सुरू होईल. यामुळे कंगनाच्या अडचणी वाढू शकतात.

उच्च न्यायालयाने एका विस्तृत आदेशात निरीक्षण नोंदवले की, " याचिकाकर्ता, ज्या एक सेलिब्रेटी आहेत, यांच्या विरोधात काही विशिष्ट आरोप करण्यात आले आहेत की, त्यांनी रिट्विटमध्ये केलेल्या खोट्या आणि बदनामीकारक आरोपांमुळे प्रतिवादीच्या प्रतिष्ठेला हानी पोहचली आणि त्यांच्या स्वतःच्या तसेच इतरांच्या नजरेत देखील त्यांची प्रतिष्ठा कमी झाली. त्यामुळे त्यांच्या हक्कांच्या समर्थनात अशी तक्रार दाखल करणे हे वाईट भावनेने केल्याचे म्हणता येणार नाही."

# बांगलादेशी अभिनेत्रीला कोलकाता येथे अटक

कोलकाता




कोलकाता येथील लालबाजार गुप्तहेर विभागाने एका २८ वर्षीय बांगलादेशी महिलेला आधार आणि मतदार ओळखपत्रे बाळगल्याच्या आरोपाखाली अटक केली आहे. या महिलेचे नाव शांता पॉल असे असून पोलिसांच्या म्हणण्यानुसार ती व्यावसायाने अभिनेत्री आणि मॉडेल आहे. ही महिला गेल्या अनेक वर्षांपासून ओळख लपवून भारतात राहत होती. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पॉल या महिलेने बांगलादेशात अनेक मॉडलिंग स्पर्धा जिंकल्या आहेत आणि ती बिजॉयगड, जाधवपूर येथे २०२३ पासून राहत आहे. तिला पार्क स्ट्रीट पोलीस ठाण्याजवळून अधिकाऱ्यांनी अटक केली.

# मानवी कवटीमुळे धर्मस्थळ प्रकरणाची गुंतागुंत वाढली

## पॅन आणि एटीएम कार्डनंतर सापडले मानवी हाडांचे अवशेष

वृत्तसंस्था
बंगळूरू

एका सफाई कामगाराने पोलिसांना पत्राद्वारे कर्नाटकातील धर्मस्थळ येथे नेत्रावती नदीच्या काठावर शेकडो मृतदेह पुरल्याचा दावा केला होता. त्यानंतर एसआयटीने १३ ठिकाणी खोदकाम सुरू केले. खोदकामाच्या तिसऱ्या दिवशी घटनास्थळ क्रमांक ६ वर मानवी हाडे सापडली आहेत. प्राथमिक तपासात ही हाडे पुरुषाची असल्याचे समोर आले आहे. दोन दिवसांपूर्वी घटनेच्या १३ पैकी एका ठिकाणापासून अडीच फूट खोलीवर लाल ब्लाउजचा



तुकडा, एटीएम आणि पॅन कार्ड सापडले होते.

नेत्रावती नदीच्या काठावरील वनक्षेत्रात उत्खननादरम्यान किमान १५ हाडे सापडली आहेत. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, उत्खननात कोणतीही कवटी सापडली नाही. फॉरेन्सिक पथकाने हाडे ताब्यात घेतली आहेत. उत्खनन जसजसे पुढे जात आहे तसतसे प्रकरण अधिक गंभीर होत चालले आहे. सफाई कामगार म्हणतो की, यापैकी एक अशी जागा आहे जिथे त्याने सर्वाधिक मृतदेह पुरले आहे. त्याने हे सर्व १९९५ ते २०१४ दरम्यान केले. त्याने असाही दावा केला आहे की, त्याने पुरलेले बहुतेक मृतदेह महिला किंवा मुलींचे होते. साक्षीदाराने नेत्रावती नदीच्या काठावर आठ ठिकाणी मृतदेह पुरल्याचे सांगितले आहे. उर्वरित ५ ठिकाणे जंगलात आहेत. दुसऱ्या घटनास्थळी उत्खनन करताना ब्लाउजचा एक तुकडा सापडला आहे. याशिवाय पॅन कार्ड आणि एटीएम कार्ड सापडले आहे. कार्ड लक्ष्मी नावाच्या महिलेचे होते. माहितीनुसार, त्या महिलेचा २००९ मध्ये मृत्यू झाला. पण, पोलीस रेकॉर्डमध्ये तिचा उल्लेख नाही.

## ट्रम्प यांची स्वप्नपूर्ती!

# व्हाईट हाऊसमध्ये साकारणार 1800 कोटींचा भव्यदिव्य बॉलरूम

वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

व्हाईट हाऊसमध्ये आता लवकरच एक भव्य बॉलरूम बांधला जाणार आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे अनेक वर्षांचे स्वप्न होते. सुमारे 200 दशलक्ष डॉलर्स खर्चून बांधल्या जाणाऱ्या या हॉलचे बांधकाम सप्टेंबरपासून सुरू होईल. ट्रम्प आणि काही खाजगी देणगीदारांकडून याकरता निधी देण्यात येणार आहे.

1800 कोटींचा खर्च असलेल्या या बॉलरुमच्या बांधकामाची अधिकृत घोषणा गुरुवारी व्हाईट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी कॅरोलिन लेविट यांनी केली. ट्रम्पसाठी या बॉलरूमची कल्पना नवीन नाही.



2016 मध्ये ट्रम्प अध्यक्षीय निवडणुकीसाठी प्रचार करत होते. त्यावेळी बराक ओबामा अमेरिकेचे अध्यक्ष होते. तेव्हा ट्रम्प यांनी त्यांच्या वैयक्तिक पैशातून व्हाईट हाऊससाठी 100 दशलक्ष डॉलर्सचा नवीन बॉलरूम बांधण्याची ऑफर दिली होती. परंतु ओबामा प्रशासनाने हा प्रस्ताव गांभीर्याने घेतला नाही. पण आता आठ वर्षांनंतर तोच प्रस्ताव प्रत्यक्षात येणार आहे.

नवीन बॉलरूम व्हाईट हाऊसच्या ईस्ट विंगजवळ बांधण्यात येणार आहे. सध्या याठिकाणी अमेरिकेच्या फर्स्ट लेडी मेलानिया ट्रम्प आणि इतर काही महत्त्वाच्या कर्मचाऱ्यांची कार्यालये सध्या आहेत. प्रेस सेक्रेटरी लेविट यांच्या मते, हा बॉलरूम सुमारे 90 हजार चौरस फूट क्षेत्रात बांधला जाईल. याची 650 आसनक्षमता असणार आहे. सध्या व्हाईट हाऊसच्या ईस्ट रूममध्ये औपचारिक कार्यक्रम आयोजित केले जातात. याची बसण्याची क्षमता केवळ 200 जणांसाठी आहे. या प्रकल्पासाठी संपूर्ण रक्कम खाजगी देणग्यांमधून येईल. यात ट्रम्प यांचे योगदान सर्वात महत्त्वाचे असणार आहे. इतर देणगीदारांची नावे अद्याप सार्वजनिक केलेली नाहीत. बॉलरूमचे बांधकाम सप्टेंबर 2025 मध्ये सुरू होण्याची अपेक्षा आहे. हा बॉलरूम 2029 मध्ये ट्रम्प यांचा कार्यकाळ संपण्यापूर्वी पूर्ण होईल.

# देवेगौडांचा नातू माजी खासदार प्रज्वल रेवण्णा बलात्कारप्रकरणी दोषी

**शनिवारी सुनावणार शिक्षा, कोर्टात रडला**

वृत्तसंस्था
बंगळुरू

कर्नाटकातील निधर्मी जनता दलाचे माजी खासदार प्रज्वल रेवण्णा यांना एका गृहोद्योग कामगार महिलेवर बलात्कार केल्याप्रकरणी विशेष न्यायालयाने दोषी ठरवले आहे. या प्रकरणाचा निकाल केवळ 14 महिन्यांत लागला असून, शिक्षेची घोषणा शनिवार (2 ऑगस्ट) रोजी करण्यात येणार आहे.

प्रज्वल रेवण्णा यांच्यावर मैसूर जिल्ह्यातील के. आर. नगर येथील एका महिलेने बलात्काराचा आरोप केला होता. या प्रकरणाची नोंद कर्नाटक सीआयडीच्या सायबर क्राइम स्टेशनमध्ये झाली होती. पीडित महिलेने कोर्टात दिलेल्या साक्षीमध्ये सांगितले की, तिच्यावर दोन वेळा बलात्कार करण्यात आला आणि त्या घटनेचे व्हिडिओ रेकॉर्डिंगही करण्यात आले.



प्रज्वल रेवण्णा हे एच. डी. देवेगौडा यांचा नातू आहे. एच.डी. देवेगौडा हे भारताचे माजी पंतप्रधान आणि जनता दल (सेक्युलर) पक्षाचे संस्थापक नेते होत. त्यांचा मुलगा एच. डी. रेवण्णा यांचा प्रज्वल हा पुत्र आहे. तर कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एच. डी. कुमारस्वामी यांचा तो पुतण्या आहे. या प्रकरणाचा तपास सीआयडीच्या विशेष तपास पथकाने (SIT) केला. महिला निरीक्षक शोभा यांच्या नेतृत्वाखालील SIT ने 123 पुरावे गोळा करून जवळपास 2000 पानी आरोपपत्र न्यायालयात सादर केले. न्यायालयाने केवळ 7 महिन्यांत 23 साक्षीदारांची चौकशी केली. पीडित महिलेने पुरावा म्हणून एक साडी सादर केली होती, जी तिने अनेक महिने जपून ठेवत होती. फॉरेन्सिक तपासात त्या साडीवर वीर्याचे अंश आढळले, जो पुरावा न्यायालयाने स्वीकारला आणि तो निर्णयात महत्त्वाचा ठरला. निकालानंतर प्रज्वल रेवण्णा न्यायालयात भावुक झाले व रडताना दिसले. न्यायालयातून बाहेर पडताना त्यांनी डोळयांत अश्रू होते. या प्रकरणात शिक्षेची घोषणा २ ऑगस्ट २०२५ रोजी विशेष न्यायालयात होणार आहे. हे प्रकरण जलदगतीने चालवल्यामुळे आणि दोषी सिद्ध होण्यास लागलेला अल्प वेळ न्याय व्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानला जात आहे.